# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२१

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०४ मार्च, २०२१ / फाल्गुन १३, १९४२ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**<br>**(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री**<br>**(३) अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री**<br>**(४) शालेय शिक्षण मंत्री**<br>**(५) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री**<br>**(६) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**<br>**(७) परिवहन, संसदीय कार्ये मंत्री**<br>**(८) पर्यटन, पर्यावरण, राजशिष्टाचार मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७३**

---

### शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण शिक्षकांना न्याय देण्याबाबत

**(१) * ६८९१ श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.संजय दौंड, श्री.कपिल पाटील, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण प्रमाणपत्रांची मुदत ७ वर्षांपर्यंत असून सन २०१३ मध्ये पात्रता परीक्षा उत्तीर्ण झालेल्या राज्यातील ३१००० उमेदवारांची प्रमाणपत्रे सन २०२१ मध्ये कालबाहय होणार असल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील १० वर्षात काही कारणामुळे शासकीय अनुदानित शाळांमधील शिक्षक भरती प्रक्रिया राबवू न शकल्याने राज्यात सन २०१३ मध्ये परीक्षा उत्तीर्ण झालेल्या टीईटी प्रमाणपत्रेधारकांना अकारण पुन्हा परीक्षा द्यावी लागणार असल्याने उक्त ३१००० उमेदवारांना सन २०२१ मध्ये कालबाहय ठरणाऱ्या प्रमाणपत्राची सात वर्षांची अट शिथिल करुन मुदतवाढ देण्याबाबत प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, शिक्षण आयुक्त, पुणे तसेच मा.शालेय शिक्षण मंत्री यांना माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निवेदन सादर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १९ जानेवारी, २०२० मध्ये शासनाने जे शिक्षक टीईटी परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत त्या शिक्षकांच्या सेवा समाप्तीचे आदेश दिल्याने शिक्षकांच्या सेवा धोक्यात आल्या असून इयत्ता १ ली ते ८ वी शिक्षक पदावर दिनांक १३/२/२०१३ नंतर नियुक्ती करण्यात आलेल्या शिक्षकास राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने निश्चित केलेली किमान अर्हता दिनांक ३०/३/२०१९ पर्यंत संपादित करणे बंधनकारक होते, परंतु टीईटी परीक्षा न झाल्यामुळे सदरहू शिक्षकांना परीक्षेची संधी पुन्हा देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) असल्यास, शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक ७ फेब्रुवारी, २०१९ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित केल्याने शासन निर्णयातील शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण करण्याची अट संपुष्टात आली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ ते दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत नियुक्त झालेल्या शिक्षकांना टीईटी पात्रता परीक्षा करण्याची अट लागू होणार नसल्यामुळे शासनाने कार्यरत शिक्षकांना दिनांक ३०/०३/२०१९ पर्यंत शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण करण्याचे दिलेले आदेशही संपुष्टात आल्याने ज्या कार्यरत शिक्षकांनी शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण केली नाही अशा सर्व शिक्षकांचे माहे जानेवारी, २०२० पासून वेतन रोखून त्यांना सेवेतून कमी केल्याचे अनुचित, बेकायदेशीर व घटनाबाहय प्रकार घडत असून शिक्षकांना प्रलंबित वेतन देण्यात येणार आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सन २०१३ मधील टीईटी परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांना न्याय देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण होण्यासाठी पुरेशा संधी देण्यात आलेल्या आहेत. तथापि, दिनांक ३१/०३/२०१९ नंतर टीईटी ही किमान अर्हता प्राप्त करण्यासाठी वाढीव संधी देण्याची बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे. तसेच केंद्र शासनाने दिनांक ३ जून, २०१९ च्या पत्रान्वये किमान अर्हता धारण करण्यासाठी शिक्षकांना मुबलक वेळ दिल्याने दिनांक ३१/०३/२०१९ नंतर अर्हता धारण करण्यास मुदतवाढ देता येणार नाही असे कळविले आहे.

(४) हे खरे नाही.

(५) कार्यरत शिक्षकांना दिनांक ३०/०३/२०१९ पर्यंत शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तथापि, सद्य:स्थितीत शिक्षक पात्रता परीक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण केली नसल्याबाबतच्या शिक्षकांचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(६) सन २०१३ मधील टीईटी उत्तीर्ण उमेदवारांना सन २०१७ मध्ये पवित्र पोर्टलमार्फत सेवेत दाखल होण्याची संधी देण्यात आलेली आहे.

-----------------

## पवनी (जि.भंडारा) तालुक्यातील धान खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत

**(२) * ७३३० डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आसगाव (ता.पवनी, जि.भंडारा) परिसरातील धान खरेदी गोदामाअभावी बंद असून आधारभूत केंद्रावर धान उचलण्यासाठी राईस मिल मालकांना आदेश देण्यात आले नाही तसेच, याबाबतची निविदा प्रक्रिया न झाल्याने धान मोजणी बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पवनी तालुक्यातील धान खरेदी केंद्र सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांनी शासनाकडे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धान खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.

भंडारा जिल्ह्यामध्ये सर्व तालुक्यामध्ये २०५ राईस मिल धारकांची नियुक्ती करुन त्यांचे करारनामे झाले आहेत. राईस मिल धारकांचे ८०,००० क्विंटल धानाचे डी.ओ. काढण्यात आले. तथापि, ज्या ठिकाणी गोदाम भरले आहे, अशा ठिकाणी उघड्यावर धान खरेदी करुन स्थानिक पातळीवर उपलब्ध होणाऱ्या गोदामामध्ये धानाची साठवणूक करण्यात येत आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

त्यानुषंगाने पवनी तालुक्यात पुर्वी ९ खरेदी केंद्र कार्यान्वित होती, परंतु आता पवनी तालुक्यात लोकप्रतिनिधींच्या मागणीप्रमाणे एकूण २३ धान खरेदी केंद्राना नव्याने मंजुरी देण्यात आलेली आहे व धान खरेदी केंद्र कार्यान्वित झाली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सहयोगी प्राध्यापक पदोन्नती व वेतन निश्चिती पडताळणी पूर्ण करण्याबाबत

**(३) * ७२६३ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पुणे व औरंगाबाद विभागातील सहाय्यक प्राध्यापकांची सन २०१९ व २०२० ची कॅश अंतर्गत पदोन्नती झाली असून सदरहू प्रक्रिया युजीसी रेग्युलेशन २०१० व त्याचे चतुर्थ संशोधन (४th Amendment) मधील पात्रता व निकषानुसार पूर्ण केल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णय दिनांक ८ मार्च, २०१९ मधील मुद्दा क्र. ७.३, ७.४A (पान क्र.२९ ते ३२) मधील उपलब्ध पर्यायानुसार सहयोगी प्राध्यापक पदी पदोन्नतीस पीएच.डी. डिग्रीची अट सर्वांनाच दिनांक ७ मार्च, २०२२ पर्यंत लागू होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लेखाधिकारी, (उच्च शिक्षण अनुदान) पुणे विभाग, पुणे यांचेकडून सहयोगी प्राध्यापकांची पदोन्नती वेतन निश्चितीची पडताळणी प्रलंबित ठेवल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कॅश अंतर्गत सहयोगी प्राध्यापक पदोन्नती व वेतन निश्चिती पडताळणी प्रकरणे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१), (२), (३) व (४) हे अंशतः खरे आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाची दिनांक ३०/०६/२०१० ची अधिसूचना शासनाने दिनांक १५/०२/२०११ च्या शासन निर्णयान्वये स्वीकारली आहे. त्यामध्ये सहयोगी प्राध्यापक या पदाच्या पदोन्नतीसाठी तीन टप्पे ठरविण्यात आलेली आहे.

अ) ज्या सहाय्यक प्राध्यापकांनी पीएच.डी केलेली आहे आणि एक संशोधन प्रसिध्द केलेले असावे.

आ) ज्या सहाय्यक प्राध्यापकांनी एम.फिल केलेली आहे आणि दोन संशोधन प्रसिध्द केलेले असावे.

इ) ज्या सहाय्यक प्राध्यापकांनी पीएच.डी किंवा एम.फिल केलेले नाही त्यांना तीन संशोधन प्रसिध्द केले असावीत.

तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाची दिनांक १८/०७/२०१८ ची अधिसूचना शासनाच्या दिनांक ०८/०३/२०१९ च्या शासन निर्णयान्वये स्वीकारली असून त्यामध्ये सहयोगी प्राध्यापक या पदोन्नतीसाठी पीएच.डी. ही अट अनिवार्य केली आहे. सदरहू संदिग्धता दूर करण्याच्यादृष्टीने संचालक, उच्च शिक्षण संचालनालय यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मार्गदर्शन मागविले असून, सदर मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणी कार्यवाही करणे उचित ठरेल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्राथमिक पदवीधर शिक्षक/ विशेष शिक्षकांना वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

**(४) * ७३५४ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १३ जिल्ह्यामध्ये प्राथमिक पदवीधर शिक्षकांना सन २०१४ पासून सरसकट ४३०० ग्रेड पे वेतनश्रेणी लागू असून उर्वरित जिल्ह्यामधील प्राथमिक पदवीधर शिक्षक/विशेष शिक्षकांना सदरहू वेतनश्रेणी लागू नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील प्राथमिक पदवीधर शिक्षक/विशेष शिक्षकांना सरसकट ४३०० ग्रेड पे वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी शिक्षक संघटना करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड :** (१), (२) व (३) राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील प्राथमिक पदवीधर शिक्षक/विशेष शिक्षकांना सरसकट ४३०० ग्रेड पे वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी शिक्षक संघटना करत आहेत. परंतु याबाबत शासन परिपत्रक दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ अन्वये कार्यवाही करण्याबाबत सूचना क्षेत्रिय स्तरावर देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया रद्द करण्याबाबत

**(५) * ६३६२ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात सन २०१७-२०१८ पासून शालेय शिक्षण विभागाने इयत्ता ११ वीची प्रवेशप्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने सुरु केल्याने विद्यार्थ्यांना अपेक्षित महाविद्यालयात प्रवेश मिळत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ऑनलाईन प्रक्रिया ३० सप्टेंबरपर्यंत ५ टप्प्यात सुरु असून विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशाची शाश्वती नसल्याने ते शहरालगतच्या महाविद्यालयात प्रवेश घेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरालगतच्या महाविद्यालयात क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात असून सन २०१७ पासून शहरात पूर्ण क्षमतेने प्रवेश प्रक्रिया न झाल्याने अनुदानित शिक्षक अतिरिक्त होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शहरातील ११६ महाविद्यालयात ३१४७० एवढी प्रवेश क्षमता असून सन २०२० मध्ये फक्त १२४४५ विद्यार्थ्यांनाच प्रवेश निश्चित करण्यात आला, तसेच मागील तीन वर्षापासून २०००० पेक्षा कमी विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी नोंद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील ११ वीची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे नाही.
(२) कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे यावर्षी इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेस विलंब झाला, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेशाची शाश्वती नाही, हे खरे नाही. ऑनलाईन प्रक्रियेमध्ये अर्ज केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतात.
(३) व (४) हे खरे नाही. ऑनलाईन क्षेत्रात व लगतच्या परिसरात सन २०२०-२०२१ या वर्षामध्ये एकूण ऑनलाईन प्रवेश क्षमता ३१,४७० आहे. प्रत्यक्ष झालेले प्रवेश १६,८२५ असून १४,६४५ जागा रिक्त राहिल्या आहेत.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला येथील मे.वैभव हॉटेल व मे.वैभव फुड्स यांच्यावर फेरतपासणी अहवालानुसार कार्यवाही करण्याबाबत

**(६) * ७२१७ श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला येथील मे.वैभव हॉटेलमधून ग्राहकांनी खरेदी केलेली हल्दीराम आलु भुजियाची ४०० ग्रॅमची पाकिटे उंदराने कुरतडलेली असून त्याठिकाणी चिकटपट्टी चिकटवून पाकिटे विकल्याने त्याबाबतची तक्रार अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषधे प्रशासन, अकोला यांच्याकडे दिनांक २४ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीनुसार दिनांक ७ नोव्हेंबर, २०२० रोजी मे.वैभव फुड्स, आदर्श कॉलनी, अकोला येथील पेढ्यांची अन्न सुरक्षा अधिकारी, अकोला यांनी सखोल तपासणी करुन हल्दीराम ब्रॅन्डचे ४०० ग्रॅमचे आलु

भुजिया पॅकेट्स, उत्पादीत मलाई पेढा इत्यादी पदार्थांचे नमुने दिनांक ९ नोव्हेंबर, २०२० रोजी प्रयोगशाळेत पाठविले असून त्याबाबतचा अहवाल प्रलंबित असल्याचे दिनांक ७ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यासंदर्भातील कलम ३२ अंतर्गत पदावधीत अधिकारी, अकोला यांनी सदर मे.वैभव फुड्स पेढीस सुधारणा नोटीस पाठविली असून त्याबाबत पुर्तता किंवा कसे याबाबत फेरतपासणी येऊन त्याबाबतच्या अहवालानुसार कार्यवाही करण्यात आली नसल्याचे दिनांक ११ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार फेरतपासणीच्या अहवालानुसार कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक ०६/११/२०२० रोजी यासंदर्भात तोंडी तक्रार प्राप्त झाली होती.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सदर प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाला प्राप्त तोंडी तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०७/११/२०२० रोजी मे.वैभव फुड्स, अकोला या पेढीची सखोल तपासणी करून पेढीतील उपलब्ध साठ्यातून इंडियन स्नॅक आलु भुजिया (हल्दीराम) व मलई पेढा या पदार्थाचे नमुने विश्लेषणार्थ घेण्यात आले. सदर नमुने विश्लेषणार्थ दिनांक ०९/११/२०२० रोजी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले असून विश्लेषण अहवाल प्रलंबित आहेत. विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यावर त्यानुसार कायदेशीर कारवाई घेण्यात येईल. तथापि, तपासणी दरम्यान पेढीत आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने सदर पेढीस कलम ३२ अंतर्गत दिनांक ०९/११/२०२० रोजी सुधारणा नोटीस पाठविण्यात आली. सुधारणा नोटीस मधील मुद्द्याची पुर्तता केल्याची खातरजमा करण्यासाठी दिनांक २४/१२/२०२० रोजी केलेल्या फेरतपासणीत सदर पेढीने नमूद मुद्द्यांची

पुर्तता न केल्याचे आढळल्याने दिनांक ०४/०१/२०२१ रोजीच्या आदेशानुसार पेढीचा परवाना दोन दिवसाकरीता (दिनांक २९/०१/२०२१ व दिनांक ३०/०१/२०२१) निलंबित करण्यात आला.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(७) * ६४७९ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.रमेशदादा पाटील : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ८ मधील प्रश्न क्रमांक ५३९० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सच्चर समितीने सन २००६ मध्ये शासनास मुस्लीम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक स्थितीबाबत सादर केलेल्या अहवालात मुस्लीम समाज मागासलेला तसेच मुस्लीम समाजास अधिक सोयी सुविधा देण्याची आवश्यकता असल्याचा उल्लेख केल्याने शासनाने मुस्लीम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक मागासलेपणाचा विचार करुन याबाबत शिफारशी करण्यासाठी दिनांक ६ मे, २००८ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे डॉ.मेहमुद-उर-रेहमान यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या अभ्यासगट समितीने सन २०१३ मध्ये शासनास अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीने अनेक महत्वपूर्ण शिफारशी केल्या असून त्यात मुस्लीम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक स्थितीचा विशेष उल्लेख करुन त्यांचा मागासलेपणा दूर करण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत शासनास सुचविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील सुमारे पाच-सहा वर्षाच्या कालावधीत याबाबत प्रयत्न झाले नसून, मुस्लीम समाजाच्या विकासासाठी पुरेसा निधी उपलब्ध न करणे, उपलब्ध निधीचा पूर्णपणे वापर न करणे अशा अनेक घटना घडल्याचे निदर्शनास आल्याने याबाबत आढावा घेण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, उक्त अहवाल विचारात घेऊन दिनांक ०९/०७/२०१४ रोजी तत्कालीन राज्य शासनाने मुस्लीम (विशेष मागास प्रवर्ग-अ) समाजासाठी आरक्षण देण्याबाबत घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी न करण्याची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) तसेच, मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याबाबत माहे फेब्रुवारी-मार्च, २०२० या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मा.अल्पसंख्यांक मंत्र्यांनी केलेल्या घोषणेची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याबाबतची बाब तपासून उक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) अल्पसंख्यांक विभागामार्फत अल्पसंख्याकांच्या शैक्षणिक, सामाजिक तसेच आर्थिक विकासाकरीता विविध योजना राबविण्यात येतात. सदर योजनांकरीता अर्थसंकल्पीत केलेल्या निधीपैकी वित्त विभागाने उपलब्ध करुन दिलेला निधी बहुतांश खर्च करण्यात येतो.

मुस्लीम समाजाला (विशेष मागास प्रवर्ग-अ) नोकरी व शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी ५ टक्के आरक्षण देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रयत शिक्षण संस्थेत नोकर भरतीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(८) * ६५१८ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्मवीर भाऊराव पाटील रयत शिक्षण संस्थेत प्राध्यापक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नोकर भरतीत गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी मा.राज्यपाल तसेच शासनाकडे करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०२० च्या दुसऱ्या पंधरवड्यात निदर्शनास आले, तसेच, संस्थेच्या पद भरतीमध्ये झालेला गैरव्यवहार निदर्शनास आल्यानंतर रयत शिक्षण संस्थेच्या सचिवांचे राजीनामे घेण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रयत शिक्षण संस्थेमध्ये नोकरीसाठी पैसे घेतले जातात, अशा तक्रारी प्राप्त झाल्या असून कोणाकडूनही पैसे घेतले जात नाहीत असा दावा संस्थेचे पदाधिकारी करीत आहेत, तसेच, ज्यांनी पैसे दिले नाही त्यांना पंधरा वर्षे होवूनही नोकरीत कायम करण्यात आले नाही, परंतु ज्यांनी पैसे दिले त्यांचे तातडीने आदेश काढण्यात आले, अशा तक्रारी शासनाकडे करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(९) * ६३८३ श्री.प्रसाद लाड, श्री.जयंत आसगावकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक १७१ ला दिनांक १३ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी कोरोनाच्या काळात जबाबदारीने काम करीत असूनही शासनाकडून शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित असलेल्या विविध मागण्यांचे एक सविस्तर निवेदन मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री, मा.शालेय शिक्षण मंत्री यांना मुंबई प्रदेश भाजप शिक्षक आघाडीचे अध्यक्ष अनिल बोरनारे यांनी दिनांक १४ व १५ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनाव्दारे विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांना अनुदानाचा शासन निर्णय निर्गमित करणे, संच मान्यतेचे सुधारित प्रस्तावित निकष रद्द करून प्रत्येक वर्ग तुकडी मागे १०५ शिक्षक व प्रत्येक शाळेत २५० विद्यार्थ्यांमागे कला, क्रीडा व कार्यानुभव शिक्षकांची विशेष व स्वतंत्र पदे संच मान्यतेत मंजूर करण्याचे सुधारित शासन निर्णय निर्गमित करणे, शिक्षकांना निवडश्रेणी व वरिष्ठश्रेणी लागू करण्यासंदर्भात कोणत्याही प्रशिक्षणाची आवश्यकता नाही असे शासन निर्णय निर्गमित करणे, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र शाळा न्यायाधिकरणाची स्थापना करणे आदी मागण्यांसह अन्य अनेक मागण्यांचा समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यातील प्रत्येक शाळांमध्ये कला व क्रीडा शिक्षकांची नेमणूक करण्यात न आल्याने शिक्षकांची नेमणूक करण्याबाबत शिक्षक संघटनेकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित विविध मागण्यासंदर्भात सादर केलेल्या निवेदनातील मागण्यांबाबत तसेच प्रत्येक शाळांमध्ये कला व क्रीडा शिक्षकांची नेमणूक करण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) व (२) याबाबतचे निवेदन प्राप्त झालेले नाही.

(३) या अनुषंगाने संघटनेकडून मागणी करण्यात येते.

(४) संचमान्यतेनुसार रिक्त पदांवर शैक्षणिक संस्थांनी केलेल्या मागणीनुसार पद भरती संदर्भात कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन अनुदान वितरण करण्याबाबत

**(१०) * ७४९८ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयंत आसगावकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.किशोर दराडे, श्री.प्रशांत परिचारक, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.बाळाराम पाटील, श्री.किरण सरनाईक, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी प्राथमिक शाळा, तुकड्या, खाजगी माध्यमिक शाळा, तुकड्या तसेच कनिष्ठ महाविद्यालय, जादा तुकड्या व अतिरिक्त शाखा यांना सरसकट २० टक्के अनुदानासाठी दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार पात्र घोषित करून सदरहू शाळांना यापुढचे २० टक्के अनुदान देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे काय, तसेच, राज्यातील शाळांना अनुदान देताना व अनुदानाचा वाढीव टप्पा देताना वित्त विभागाने शाळांची तपासणी सुरू केल्यामुळे संबंधित अंशत: अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांची गटशिक्षण अधिकारी, जिल्हा मुल्यांकन समिती, उपसंचालक, संचालक यांच्याकडून तपासणी करून शिक्षण आयुक्त कार्यालयामार्फत सदरहू शाळा अनुदानास पात्र असतानाही संबंधित शाळांचे दिनांक १ एप्रिल, २०१९ पासूनचे मागील १९ महिन्यांचे वेतन रद्द करण्यात आल्याने राज्यातील जवळपास ४५ हजार कर्मचारी वेतनापासून वंचित राहिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ०९ मे, २०१६ व दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार २० टक्के अनुदान मंजूर केलेल्या तसेच दिनांक १ व २ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार पात्र घोषित केलेल्या शाळांना दिनांक ०१ एप्रिल, २०१९ पासून वाढीव २० टक्के अनुदान मंजूर करण्यात आले, तसेच, दिनांक ४ डिसेंबर २०२० रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना प्रचलित नियमानुसार वेतन वितरणाचे आदेश काढण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत दिनांक ०१/१०/२०२० पासून अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आल्याने कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाल्याने शासनस्तरावर प्रलंबित असलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मूळ वर्ग व तुकड्या घोषित करुन अनुदान देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, तसेच, उक्त आदेशाची अंमलबजावणी व प्रचलित नियमानुसार वेतन वितरित करण्यात न आल्याने राज्यातील शिक्षकांनी वेतन अनुदान मिळावे या मागणीसाठी एक दिवशीय लाक्षणिक उपोषण करुन शासनाचे लक्ष वेधले होते, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजी अनुदानास पात्र म्हणून शासन निर्णय निर्गमित केलेल्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना दिनांक ०१ एप्रिल, २०१९ पासून २०% वेतन अनुदान देण्यासाठी आर्थिक तरतुद करुन शिक्षक-कर्मचार्यांचे वेतन नियमित सुरु करण्याकरीता व अनुदानासाठी मुल्यांकनाचे निकष पूर्ण केलेल्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालय व सन २०१२-२०१३ च्या वर्ग तुकड्यांना अनुदानास पात्र म्हणून घोषित करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील अनुदानाची प्रतिक्षा करणाऱ्या शाळांना २० टक्के वाढीव अनुदान देण्यासंदर्भात शासनाने ५ व्यक्तींची त्रुटी समिती माहे सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात स्थापन केल्याचे निदर्शनास आले असून सन १९९९ ते २००० पासून शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आली होती, परंतु सदरहू शाळांवरील काम करणारे शिक्षकवर्ग विनावेतन निवृत्त झाले होते, तसेच, राज्यातील २० टक्के अनुदान घेत असलेल्या शाळांमधील शिक्षकांना सेवा संरक्षण मिळण्याबाबत शिक्षक व

शिक्षक संघटनांना संबंधित विभागाकडे मागणी करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून २० टक्के अनुदान घेत असलेल्या शाळांमधील शिक्षकांना सेवा संरक्षण मिळत नसल्याने शिक्षकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासन निर्णय दिनांक ०४/१२/२०२० मधील अट क्र.५ व ६ रद्द करुन अनुदान पात्र केलेल्या व अघोषित शाळांना घोषित करुन दिनांक ०१/०४/२०१९ पासून प्रचलित नियमाप्रमाणे शाळांची तपासणी पूर्ण करुन अनुदान देण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत तसेच अनुदानास पात्र शाळांना वाढीव अनुदान देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१), (२), (३), (४), (५) व (६) मंत्रिमंडळाच्या दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० च्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## उल्हास नदीमध्ये (जि.ठाणे) प्रदूषण होत असल्याबाबत

**(११) * ६७२३ श्री.रविंद्र फाटक, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.महादेव जानकर, श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हास नदीमध्ये (जि.ठाणे) घरगुती सांडपाणी तसेच औद्योगिक क्षेत्रातून दररोज ६०० दशलक्ष लिटर रसायनमिश्रित सांडपाणी व मलमूत्र प्रक्रिया न करताच सोडले जात असल्याने या प्रदूषित पाण्यामुळे नदया, तलाव, विहिरी प्रदूषित होवून नदीपात्रात जलपर्णी वनस्पती उगवल्याचे माहे डिसेंबर, २०२० व जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उल्हास नदीस वालधुनी या प्रदूषित नदीचे स्वरुप आल्याने नागरिकांना तसेच जलसृष्टीला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार प्रदूषण रोखण्याकरीता कार्यवाही करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३) वालधुनी व उल्हास नदी प्रदूषणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत अंबरनाथ/बदलापूर मधील उद्योगांचे सर्वेक्षण करण्यात आले असून त्यामध्ये त्रुटी आढळून आलेल्या उद्योगांना जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) कायदा, १९७४ मधील तरतूदीनुसार कारवाई करण्यात आलेली आहे.

घरगुती सांडपाणी वालधुनी व उल्हास नदीमध्ये सोडणाऱ्या उल्हासनगर महानगरपालिका, अंबरनाथ नगरपरिषद, कुळगाव-बदलापूर नगरपरिषद व कल्याण-डोंबिवली महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांना दिनांक २४/११/२०२० व १८/१२/२०२० रोजी निर्देश देण्यात आलेले असून त्यामध्ये नाल्यामध्ये विनाप्रक्रिया जात असलेल्या घरगुती सांडपाण्यावर तातडीने अल्पकालीन व्यवस्था (Short term Measures) करण्याकरीता नाला-ईन-सीटू संयंत्रणा (Nalla-in-situ treatment) उभारण्याबाबतचा समावेश करण्यात आला आहे.

उल्हास नदी प्रदूषणाच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयात सिव्हिल अपील क्र. १०५८२/२०१७ (उल्हासनगर महानगरपालिका वि. वनशक्ती पब्लिक ट्रस्ट) दाखल करण्यात आले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लातूर विभागातील सर्व बस स्थानकांची दुरवस्था झाल्याबाबत

**(१२) * ७२९१ श्री.रमेश कराड :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर विभागांतर्गत येणाऱ्या २२ हून अधिक बस स्थानकांची अत्यंत दुरवस्था झाली असून स्वच्छतेचा अभाव तसेच शौचालय, शुध्द पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध नसणे अशा प्रकारच्या दुरवस्थेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व जनतेकडून तक्रारी प्राप्त होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन परिणामी प्रवाशांना बस स्थानकात होणाऱ्या गैरसोई तसेच मोडकळीस आलेल्या अस्वच्छ बस स्थानकांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) हे खरे नाही.

(२) लातूर विभागातील सर्व बस स्थानकांना आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच, देवणी, निलंगा, लामजाना, औसा या जुन्या झालेल्या बस स्थानकांची पुनर्बांधणीची कामे सुरु आहेत व उद्‌गीर आणि कासारशिरसी बस स्थानकांच्या कामांचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

शिरुर अनंतपाळ बस स्थानकाच्या नुतनीकरणाचे काम पूर्ण झालेले आहे. तसेच चाकूर, शिरुर ताजबंद, अहमदपूर, नळेगाव, मध्यवर्ती बस स्थानक, लातूर, औराद शहाजनी, औसा (जुने), लातुर (शिवाजी चौक), रेनापूर, मुरुड, जळकोट इ. ठिकाणच्या बस स्थानकाची कामे "बांधा वापरा व हस्तांतरीत करा" या माध्यमातून प्रस्तावित असून, लातूर विभागातील सर्व बस स्थानकांची स्वच्छता स्थानिक पातळीवर आगाराच्या देखरेखीखाली केली जात आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भेसळयुक्त सुपारीचा व्यवसाय रोखण्याबाबत

**(१३) * ६५४८ श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लकड़गंज, नागपूर येथील फ्री ऑक्ट्रॉय झोनमध्ये ६८ लाखाची भेसळयुक्त सुपारी जप्त केल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत कारवाई करण्यात आल्यानंतरही भेसळयुक्त सुपारीचा व्यवसाय सुरु असून प्रशासनामार्फत योग्यती कार्यवाही होत नसल्याने अवैध व्यवसाय करण्यास व्यवसायिकांना चालना मिळते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू भेसळयुक्त सुपारीचा व्यवसाय रोखण्याची कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) उपरोक्त प्रकरणी अन्न व औषध प्रशासनातर्फे घटना स्थळावरुन सुपारीचा नमुना विश्लेषणास्तव घेण्यात येवून उर्वरीत ३७१६८ किलो रुपये ६७,६४,५७६/- किंमतीचा सुपारीचा साठा जप्त करण्यात आला. सदर प्रकरणात विश्लेषण अहवालामध्ये सुपारीचा नमुना शरीरास अपायकारक असल्याचे निष्पन्न झालेले आहे. त्या अनुषंगे पुढील तपास चालु असून तपास पूर्ण होताच संबंधितांविरुध्द मा.न्यायालयात खटला दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रभागा नदीपात्र (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) दूषित झाल्याबाबत

**(१४) * ७२८१ श्री.प्रशांत परिचारक, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील वाखारी, शिराढोण, गोपाळपूर, शेगाव, दुंमला, गुरसाळे गावातील सांडपाणी चंद्रभागा नदी पात्रात येत असून ह्या दूषित पाण्याचा वापर येथील भाविक व स्थानिक नागरिक पिण्यासाठी करीत असल्याने नागरिकांना दूषित पाण्यामुळे त्रास होवून त्यांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर गावातील सांडपाणी चंद्रभागा नदीपात्रात येऊ नये यासाठी ड्रेनेज व आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सदरील गावांकरीता भूजलावर आधारित पाणीपुरवठा योजना कार्यान्वित आहेत. तसेच सर्व गावांमध्ये जलशुध्दीकरण यंत्रणेव्दारेही (R.O.) पिण्यासाठी शुध्द पाणीपुरवठा होत आहे. दूषित पाण्यामुळे काही साथरोग उद्‌भवले नाहीत.
(२) १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून सांडपाणी प्रक्रियेसाठी मौजे वाखरी येथे संतुलन टाकीचे, मौजे शेगाव दुंमला व गुरसाळे येथे स्थिरीकरण हौदाचे काम प्रस्तावित आहे. मौजे शिरढोण येथील सांडपाणी शोष खड्ड्यात सोडले जात आहे. मौजे गोपाळपूर येथील नदीच्या दिशेने जाणारे सांडपाणी अल्प प्रमाणात आहे. तथापि, सांडपाणी प्रक्रियेकरीता ग्रामपंचायतीकडे जागेची उपलब्धता नसल्याने सदर सांडपाणी प्रक्रियेकरीता पर्यायी संभाव्य उपाययोजना तपासण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी, सोलापूर यांना दिल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गोंडवाना (जि.गडचिरोली) येथील मॉडेल कॉलेजला निधी देण्याबाबत**

**(१५) * ६७८० श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी बहुल आणि उच्च शिक्षणाचे प्रमाण कमी असलेल्या गडचिरोली जिल्ह्यात स्थापन करण्यात आलेले मॉडेल कॉलेज गोंडवाना (गडचिरोली) विद्यापीठाला हस्तांतरीत करण्याचा निर्णय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विद्यापीठासाठी लागणारी अद्ययावत इमारत वसतिगृह व अभ्यासक्रमासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन दिला आहे काय, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) व (२) गडचिरोली जिल्ह्यात स्थापन करण्यात आलेले मॉडेल कॉलेज गोंडवाना (गडचिरोली) विद्यापीठाला हस्तांतरीत करण्याबाबत तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेकडे उपलब्ध करून दिलेला एकूण निधी रुपये ३,२७,३५,०००/- व त्यावरील व्याजाच्या रकमेसह गोंडवाना विद्यापीठास हस्तांतरीत करण्याबाबत शासन निर्णय दिनांक १३/०१/२०२१ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद जिल्ह्यातील शाळांसाठी आरटीई अंतर्गत विद्यार्थ्यांची निवड करण्याबाबत**

**(१६) * ६६२८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण हक्क कायद्यांतर्गत शालेय प्रवेशात २५ टक्के आरक्षणाची तरतूद असतानाही आरटीई अंतर्गत औरंगाबाद जिल्हयातील ५८४ शाळांसाठी १६५०० पेक्षा अधिक अर्ज आले असतानाही केवळ ५६७६ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेतून श्रीमंतांना या नामांकित इंग्रजी शाळेत मोफत प्रवेश मिळत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शालेय प्रवेश मिळण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) अंशत: खरे आहे. प्राप्त झालेल्या अर्जानुसार प्रवेश देण्यात येत नसून, रिक्त जागेनुसार प्रवेश देण्यात येतात. सदर जिल्हयात फक्त ५०९८ रिक्त जागा उपलब्ध होत्या.
(२) हे खरे नाही.

तहसिलदार यांनी दिलेल्या उत्पन्नाच्या दाखल्यानुसार प्रवेश देण्यात आले आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाचे काम सुरु करण्याबाबत

**(१७) * ६५८० श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विनायकराव मेटे, श्री.सुरेश धस : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ८ मधील प्रश्न क्रमांक ४८७३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यासाठी शासनाने "मराठवाडा वॉटर ग्रीड" या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला सन २०१९ मध्ये प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केली असून सदर प्रकल्पाचा प्रथम टप्पा सुरू करण्यासाठी मराठवाड्यातील काही जिल्ह्यांची निवड करण्यात आली, तसेच सदरहू योजनेत मराठवाड्यातील एकूण ६४ हजार ५९० चौरस कि.मी. क्षेत्र असून ७९ शहर, ७६ तालुके आणि १२९७८ गावांचा योजनेच्या लाभ क्षेत्रात समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेचा उद्देश मराठवाड्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याचा असून शासनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे सदरहू योजना प्रलंबित असून मराठवाड्यातील दुष्काळाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी या प्रकल्पाला निधी देऊन प्रकल्प सुरू करून पूर्णत्वास नेण्याबाबत अनेक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३/१०/२०२० रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे विनंती केली आहे, हे ही खरे हे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन 'मराठावाडा वॉटर ग्रीड' प्रकल्प कार्यान्वित करून मराठवाड्यातील पाण्याचा अनुशेष भरून काढण्याच्यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, तसेच, सदरहू प्रकल्पाच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात व निधीची तरतूद करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

सदरहू योजनेत मराठवाड्यातील एकूण क्षेत्र ६४.५ हजार चौ. कि.मी. आहे. २५ नगर पंचायत, ५० नगर परिषद व ४ महानगरपालिका अशी एकूण ७९ शहरे, ७८ तालुके आणि १२९७८ गावे आहेत.

(२) शासनस्तरावर कार्यवाही चालू असून लोकप्रतिनिधींचे दिनांक १३/१०/२०२० चे पत्र शासनास प्राप्त झाले आहे.

(३) होय.

मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक २३/२/२०२० च्या बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर, वैजापूर व पैठण तालुक्यांना जायकवाडी धरणातून ग्रीड प्रस्तावित करणे, तसेच उस्मानाबाद जिल्ह्यासाठी उजनी/सिना कोळेगाव/निम्न तेरना धरणातून ग्रीड प्रस्तावित

करणे यासाठी प्रथम, व्दितीय व तृतीय ग्रीडच्या प्रस्तावास शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे. मा.मंत्रिमंडळाच्या अंतिम मान्यतेनंतर त्याप्रमाणे योजना कार्यान्वित करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शिक्षण विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१८) * ६९३६ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागातील शिक्षण मंडळाचे अध्यक्ष/सचिव तसेच शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी इत्यादी शिक्षण क्षेत्रातील महत्वाची पदे अनेक वर्षापासून रिक्त असून शिक्षण क्षेत्राचा कारभार प्रभारी अधिकाऱ्यांमार्फत सुरु असल्याचे दिनांक ०३ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण उपसंचालक प्रभारी, शिक्षणाधिकारी ५ पदे प्रभारी, उपशिक्षणाधिकारी २० पदे रिक्त, तर गटशिक्षणाधिकारी ५३ पदे रिक्त असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील ४ वर्षापासून प्रभारीमार्फत शिक्षण क्षेत्राचा कारभार सुरू असल्याने शिक्षण क्षेत्रातील अनेक महत्वाचे प्रश्न व समस्यांना योग्य न्याय मिळत नसल्याने निर्णय घेण्यास विलंब होत असून प्रलंबित प्रकरणामुळे समस्याग्रस्तांना मानसिक व आर्थिक समस्येस सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार सद्य:स्थितीत दहावी ते बारावीपर्यंत ३.५० लक्ष विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न निर्माण होत असल्याने नागपूर विभागातील शिक्षण क्षेत्रातील रिक्त पदे भरण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय, तसेच उक्त रिक्त पदे केव्हापर्यंत भरण्यात येणार आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) शिक्षण उपसंचालकांचे पदावर नियमित अधिकारी देण्यात आलेला आहे. इतर पदे भरण्यासाठी शासनस्तरावरुन कार्यवाही सुरु आहे. विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून रिक्त पदांचा कार्यभार प्रभारी अधिकाऱ्यांकडून पार पाडण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळा व शिक्षकांना पाच दिवसांचा आठवडा लागू करणेबाबत

**(१९) * ६९१७ श्री.सुरेश धस, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना पाच दिवसांचा आठवडा लागू करण्यात आला असून शाळा व शिक्षकांना लागू करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शिक्षक वर्गावर अन्याय होत असून विद्यार्थ्यांसाठीही पाच दिवसांचा आठवडा करण्यासाठी शिक्षक संघटना आग्रही मागणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, शिक्षण संचालक आणि शिक्षण सचिव यांनी मान्यता देऊनही राज्यातील शाळांना पाच दिवसाचा आठवडा करण्याबाबत अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळेलाही दररोज अर्धा तास वाढवून पाच दिवसांचा आठवडा लागू करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) होय.

(२) शाळांना ५ दिवसांचा आठवडा करण्याबाबतची निवेदने प्राप्त झाली आहेत.

(३) शिक्षण संचालक आणि शिक्षण सचिव यांनी मान्यता दिलेली नाही, त्यामुळे अंमलबजावणीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) व (५) राज्य शासकीय कार्यालयांसाठी ५ दिवसांचा आठवडा लागू करण्याबाबत निर्गमित केलेल्या दिनांक २४/०२/२०२० च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट “अ” नुसार शाळांना ५ दिवसाच्या आठवड्याबाबतचे आदेश लागू राहणार नाहीत असे नमूद करण्यात आलेले आहे. त्यामुळे याबाबत शासनस्तरावर कोणतीही कार्यवाही प्रस्तावित नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: मुंबईतील अकरावीचे ऑनलाईन शिक्षण व अभ्यासक्रम पूर्ण करण्याबाबत

**(२०) * ६८१३ अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: मुंबईतील शाळा-महाविद्यालये सुरु होण्यास विलंब होत आहे, तसेच, इयत्ता अकरावीची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली नसून ऑनलाईन शिक्षण व अभ्यासक्रम पूर्ण करण्याबाबत शिक्षण विभागाने महाविद्यालयांना कोणत्याच सूचना दिल्या नसल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इयत्ता अकरावीचे विद्यार्थी प्रवेशाच्या प्रतिक्षेत असून दोन महिन्यात विद्यार्थ्यांना परिक्षांना सामोरे जावे लागणार आहे, तसेच, ज्या विद्यार्थांनी प्रवेश घेतला आहे त्यांच्याकडून अनेक महाविद्यालय जादा शुल्क आकारीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार अकरावीचे ऑनलाईन शिक्षण व अभ्यासक्रम पूर्ण करण्याची कार्यवाही करुन जादा शुल्क आकारणाऱ्या महाविद्यालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे नाही.

एमएमआर रिजनसह पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर, औरंगाबाद व नाशिक या शहरातील इयत्ता ११ वी ची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया देखील पूर्ण झाली असून राज्याच्या उर्वरित भागात ऑफलाईन प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली आहे. इयत्ता ९ वी ते १२ वी चे प्रत्यक्ष वर्ग दिनांक २३/११/२०२० पासून सुरू करण्यात आले आहेत. तसेच, ज्या ठिकाणी प्रत्यक्ष शाळा सुरू होऊ शकल्या नाहीत त्या ठिकाणी इयत्ता ११ वी च्या विद्यार्थ्यांसाठी सह्याद्री वाहिनी, यु-ट्युब लाईव्हच्या माध्यमातुन तासिका घेण्यात येत आहेत, शिवाय प्रत्येक महाविद्यालयनिहाय Microsoft Teams, Zoom, Webex व Google Classroom च्या माध्यमातून ऑनलाईन शिक्षण सुरू आहे.

(२) हे खरे नाही.

अकरावीचे सर्व प्रवेश निश्चित करण्यात आले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याविरूध्द कारवाई करणेबाबत

**(२१) * ६८५६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वक्फ मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील दर्गाह दाऊद अवलिया मगरिबी या वक्फ संस्थेच्या मालमत्तेवर कायदेशीर कार्यवाही करून वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ९७ अन्वये ताब्यात घेण्याबाबत शासन निर्णय, दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी जाहीर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाडे पट्टा करार रद्द करणे व सदरची मालमत्ता वक्फ मंडळाकडे पुर्ववत करणे, याबाबत विलंब व दुर्लक्ष करणाऱ्या मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ, औरंगाबाद यांच्याविरूध्द कारवाई करण्यात यावी, अशी मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी मुख्य सचिव यांच्याकडे सन २०२१ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याविरूध्द कारवाई करून सदरील मालमत्ता ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक :** (१) होय.

(२) मुख्य सचिव कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार असे लेखी निवेदन प्राप्त झालेले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पेण (जि.रायगड) तालुक्यातील गावांना पाणीपुरवठा करण्याबाबत

**(२२) * ६९९२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यामध्ये पावसामुळे महापूराची परिस्थिती निर्माण झाल्याने येथील ग्रामीण भागाला पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेण तालुक्यातील वाशी, मसद, शिर्की तसेच खारेपाटातील १४ ग्रामपंचायतींच्या कार्यक्षेत्रातील अनेक गावे व वाड्यांमध्ये पाणी टंचाईची समस्या निर्माण झाली आहे तसेच भारत निर्माण योजनेंतर्गत राबविण्यात

आलेल्या पाणीपुरवठा योजना बंद होण्याच्या मार्गावर असून पेण खारेपाटाला पाणीपुरवठा करणाऱ्या शहापाडा धरणाच्या पाण्याचा तुटवडा माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पेण तालुक्यातील गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) खारेपाटातील १४ ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात पाणीपुरवठा करणाऱ्या शहापाडा धरणाच्या पाण्याचा माहे डिसेंबर, २०२० च्या सुमारास पाण्याचा तुटवडा जाणवला हे खरे आहे.
(३) शहापाडा धरणाच्या पाण्याची क्षमता सद्य:स्थितीतील वाढीव लोकसंख्येस अपूरी पडत आहे. यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, माणगांव विभागामार्फत हेटवणे धरण उद्भव ते शहापाडा धरण पाईपलाईनचे काम सुरु आहे. तसेच तरणखोप येथील सिडको टॅपिंगवरुन या भागास २४ तास महामंडळाव्दारे पुरेसा पाणीपुरवठा करण्याचे आदेश सिडकोस देण्यात आलेले आहेत. शहापाडा धरणाच्या खालील बाजूस वाहणाऱ्या हेटवणे कालव्यावर उच्च अश्वशक्ती पंपाव्दारे पाणी उचलून या दोन ठिकाणचे पाणी शहापाडा प्रादेशिक योजनेतील गावे/वाड्यांना देण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच या भागाकरीता सन २०२०-२०२१ साठी रुपये १३०.०० लक्ष रक्कमेचा पाणी टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माहूर (जि.नांदेड) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या बस स्थानकाची दुरवस्था झाल्याबाबत

**(२३) * ६७३५ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.मोहनराव कदम, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिर्थक्षेत्र माहूर (जि.नांदेड) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या बस स्थानकाचे लाखो रुपये खर्च करुन दुरुस्ती व सौंदर्यीकरण करण्यात आले असतानाही बस स्थानक व परिसरात नियमित साफसफाई होत नसल्याने बस स्थानक अस्वच्छ होत असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बस स्थानकात स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्ष व पिण्याचे पाणी उपलब्ध नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू बस स्थानकाची नियमित स्वच्छता करुन येथे प्रवाशांसाठी पिण्याचे पाणी व स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्ष उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) तिर्थक्षेत्र माहूर (जि.नांदेड) येथील बस स्थानकावर महामंडळाच्या आगार स्तरावरुन एका खाजगी सफाईगाराची पूर्णवेळेसाठी नेमणूक करण्यात आलेली असून, त्याचेकडून नियमित साफसफाई करुन घेण्यात येते. तसेच, बस स्थानकावर स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्ष उपलब्ध आहे व २४ तास पिण्याचे पाणी उपलब्ध आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील वायू प्रदूषण रोखण्याबाबत

**(२४) * ७२६८ श्री.रमेशदादा पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील वायू प्रदूषणात दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे निदर्शनास आले असून माहे डिसेंबर, २०२० आणि जानेवारी, २०२१ या महिन्यात प्रदूषणात कमालीची वाढ झाल्याने हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक वाईट नोंदविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लॉकडाऊन शिथिल झाल्याने मुंबईतील उद्योगधंदे, मेट्रो व रस्त्याची कामे सुरु झाली असून खाजगी वाहतुकीमुळे प्रदूषणात वाढ झाल्याने धूर व धूळीच्या प्रदूषणामुळे ५०० मीटरहून अधिक अंतरावरील नीट दिसत नसल्याने मुंबईची हवा अत्यंत प्रदूषित झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई शहर व परिसराला धूर, धूळ व हवा यापासून प्रदूषण मुक्त करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून ११ वायु सर्वेक्षण केंद्रांवरुन मुंबई शहर व उपनगर येथील हवेचे गुणवत्ता मापन केले जाते.

माहे डिसेंबर, २०२० व जानेवारी, २०२१ मध्ये मुंबई शहराचा हवा गुणवत्ता निर्देशांक अनुक्रमे १३१ व १४० आढळून आलेला आहे व हा निर्देशांक मध्यम श्रेणीमध्ये वर्गीकृत होतो.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिका व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मुंबई शहरासाठी तयार केलेल्या हवा प्रदूषण नियंत्रण कृती आराखड्यास केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या त्रिसदस्यीय समितीने मान्यता दिली असून सदर आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ग्रंथपाल पदासाठी विद्यार्थी संख्येची अट शिथिल करणेबाबत

**(२५) * ६९७२ श्री.बाळाराम पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ८ मधील प्रश्न क्रमांक ५११४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाने दिनांक २८ जानेवारी, २०१९ रोजी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संदर्भात जाहीर केलेल्या आकृतिबंधानुसार ग्रंथपाल पदासाठी विद्यार्थी संख्येची अट १००० करण्यात आली असून संचमान्यतेतून इयत्ता ५ वीची विद्यार्थी संख्या वगळण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २८ जानेवारी, २०१९ रोजीचा आकृतिबंध अन्यायकारक असून ग्रंथपाल पदासाठी विद्यार्थी संख्येची अट शिथिल करुन ५०० विद्यार्थी याप्रमाणे करण्यात यावी व इयत्ता ५ वीची विद्यार्थी संख्या ग्राह्य धरावी यासाठी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमधून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आकृतिबंधामधील विद्यार्थी संख्येची अट शिथिल करून इयत्ता ५ वी ची विद्यार्थी संख्या ग्राह्य धरण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील सर्व अनुदानित/अंशत: अनुदानित खाजगी माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आकृतिबंध दिनांक २८/०१/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आला आहे. त्या अन्वये ज्या शाळाची इ. ६ वी ते १२ वीची विद्यार्थी संख्या १००१ असेल अशा शाळांना पूर्णवेळ ग्रंथपाल पद अनुज्ञेय आहे.

(२) पूर्णवेळ ग्रंथपाल पदासाठी विद्यार्थी संख्येची अट शिथिल करण्याची मागणी होत आहे.
(३) व (४) पूर्णवेळ ग्रंथपालांचे समायोजन करण्यासाठी विद्यार्थी संख्येची अट शिथिल करण्याबाबतचा शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांचेकडून प्राप्त झालेला प्रस्ताव शासनस्तरावर तपासण्यात येत आहे.

-----------------

## कशेडी घाटात (ता.पोलादपूर, जि.रायगड) खाजगी बसला अपघात झाल्याबाबत

**(२६) * ६५१४ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कशेडी घाटात (ता.पोलादपूर, जि.रायगड) वेगमर्यादेचे उल्लंघन करून गाडी चालविल्याने विरार-कणकवली ही खाजगी बस तब्बल ५० फुट खोल दरीत कोसळून झालेल्या अपघातात एका लहान मुलाचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक ३१ डिसेंबर, २०२० रोजी घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होवून निष्पाप लोकांचे नाहक बळी रोखण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या तसेच सदर प्रकरणातील दोषी चालक, मालक व परिवहन अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) हे खरे आहे.
(२) अपघातग्रस्त वाहन क्रमांक एमएच-४८-के-४२३७ या वाहनाचे चालक श्री.प्रणित चंद्रकांत चव्हाण यांनी अतिवेगाने चालवून अपघात केल्याप्रकरणी पोलादपूर पोलीस स्टेशन येथे क्र.५७/२०२० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर वाहनचालकाची अनुज्ञप्ती निलंबित करण्यात आली असून वाहनाची नोंदणी निलंबित करण्यात आलेली आहे.

अशा प्रकारच्या अपघातांना प्रतिबंध करण्यासाठी मोटार वाहन विभागाच्या वायुवेग पथकाकडून वाहनांची तपासणी करण्यात येते. दिनांक ०१/०४/२०२० ते ३१/०१/२०२१ या कालावधीत ९३९९८ वाहनांची तपासणी करून रुपये १०३,२१,१४,०००/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अकृषी विद्‌यापीठांमधील वेतन गैरव्यवहाराबाबत

**(२७) * ६६६९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ४२४६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अकृषी विद्‌यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदनामात बदल होऊन वेतनश्रेणीत झालेला बदल शासन निर्णय दिनांक १७/१२/२०१८ अन्वये रद्द करण्यात आला असून सदरहू शासन निर्णयासंदर्भात अनेक याचिका मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठाने उक्त प्रकरणाची सखोल तपासणी करुन महालेखापाल कार्यालयास अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ६ विद्‌यापीठांमधील प्राध्यापक व इतर अधिकाऱ्यांचे पदनाम करुन केलेल्या अनियमिततेस जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांविरोधात सुरु असलेली विभागीय चौकशीची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार चौकशीच्या अनुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, खरे आहे.

(२) व (३) सदरहू प्रकरणात नेमलेल्या प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, कोकण विभाग, नवी मुंबई यांनी त्यांचा अहवाल शासनास सादर केलेला आहे. सदर प्रकरणातील अपचारी यांच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द होत असल्याचे प्रादेशिक चौकशी अधिकारी यांनी त्यांच्या अहवालात नमूद केलेले आहे. तद्नंतर चौकशी अधिकाऱ्यांचा अहवाल संबंधित अपचारी यांच्यावर बजावण्याबाबत विभागीय चौकशी नियम पुस्तिका, १९९१ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयातील अंगणवाडी व शाळांमध्ये नळजोडणी करण्याबाबत

**(२८) * ७३१० डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात जलजीवन मिशन प्रकल्पांतर्गत जिल्हयातील दोन हजाराहून अधिक अंगणवाडी व शाळांमध्ये आतापर्यंत नळजोडणी झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार सदरील ठिकाणी अंगणवाडी व शाळांमध्ये नळजोडणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) नाही, हे खरे नाही.

यवतमाळ जिल्हयातील ११११ अंगणवाडी केंद्रांना जलजीवन मिशन अंतर्गत नळजोडणी झाली आहे व उर्वरित १५६८ अंगणवाडी केंद्र नळजोडणीचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) यवतमाळ जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी केंद्रांना जलजीवन मिशन अंतर्गत नळजोडणी करण्याकरीता प्रारूप आराखडा तयार करण्यात आला असून त्यानुसार नळजोडणीची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) सदर प्रकरणी विलंब झालेला नाही.

-----------------

## दांडवाडी व कातळाची वाडी (ता.खालापूर, जि.रायगड) येथील आदिवासी कुटुंबांना पाणीपुरवठा करण्याबाबत

**(२९) * ६६५८ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दांडवाडी व कातळाची वाडी (ता.खालापूर, जि.रायगड) येथील ९० आदिवासी कुटुंबियांनी विहिरीतील दूषित पाणी प्यायल्याने येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, म्हशीच्या तबेल्यातील मलमूत्र जमिनीत झिरपून ते थेट विहिरीत जात असल्याने पाण्याची मोठी समस्या निर्माण झाली असून सदर विहिरीतील पाणी प्यायल्याने लहान मुले व वयोवृध्द यांना अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दांडवाडी व कातळाची वाडी या भागात एकमेव विहिर असल्याने येथील आदिवासींना पिण्याच्या पाण्यासाठी अनेक वर्षापासून पायपीट करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार नागरिकांना विहिरीचे शुध्द पाणी मिळण्याकरीता कार्यवाही करुन त्यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) या स्वरूपाची तक्रार दांडवाडी व कातळाची वाडी (ता.खालापूर, जि.रायगड) येथील ग्रामस्थांनी केली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

कातळपाडा (विणेगाव ग्रामपंचायत कलोते रायते) येथे उद्भव विहिर तसेच विंधन विहिरीवरून नळ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित आहे. दांडवाडी येथे उद्भव विहिरी वरून नळ पाणीपुरवठा योजना सुरू आहे.
(४) ग्रामपंचायतीच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २९/१२/२०२० व दिनांक १०/०२/२०२१ रोजी पाहाणी केली असून पिण्याचे पाणीपुरवठा योजना चालू आहे. ग्रामपंचायत विहिरीची आवश्यक देखभाल दुरूस्ती करीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यातील प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी घालण्याबाबत

**(३०) * ७३३६ श्री.रामदास कदम, श्री.राजेश राठोड, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्लास्टिक बंदीचा अधिनियम दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी अंमलात आल्यानंतर त्यानुसार २ ग्राम वजनापेक्षा कमी व ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक कॅरीबॅगवर बंदी आणून बंदीचे उल्लंघन करणाऱ्यांवर रुपये ५ हजार दंडाच्या कारवाईची तरतूद असताना राज्यातील अनेक महानगरपालिकाक्षेत्रात प्लास्टिक कॅरीबॅगचा वापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईसह पुणे, औरंगाबाद, सोलापूर, नाशिक, नागपूर आदी महापालिकांमध्ये प्लास्टिक कचऱ्यांवर कारवाई करण्यात शिथिलता येत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ठाणे महानगरपालिका हद्दीत मुलुंड, भांडुप तसेच उल्हासनगर भागात प्लास्टिक पिशव्यांची निर्मिती होत असल्याने त्याठिकाणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१), (२) व (३) अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकॉल अविघटनशील वस्तुंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना २०१८ च्या तरतुदीनुसार प्लास्टिक पिशव्यांच्या वापरास बंदी घालण्यात आली.

सदर अधिसूचनेतील तरतुदींची अंमलबजावणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व स्थानिक स्वराज्य संस्थांकडून करण्यात येते.

तथापि, प्लास्टिक पिशव्यांच्या तूरळक प्रमाणात वापर निदर्शनास आल्यास संबंधितांवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व स्थानिक स्वराज्य संस्थांकडून नियमितपणे कार्यवाही करण्यात येते.

राज्यातील दुकाने/आस्थापनांकडून माहे जून, २०१८ ते फेब्रुवारी, २०२१ पर्यंत एकूण रुपये ९.८९ कोटी एवढा दंड गोळा केला असून जवळपास १२२४ टन इतका बंदी असलेला प्लास्टिकचा साठा जप्त करण्यात आला आहे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ऑक्टोबर, २०१८ ते फेब्रुवारी, २०२१ या कालावधीत एकूण ४१५ कारखान्यांना अधिसूचनेचा भंग केल्याबद्दल उत्पादन बंदचे आदेश दिले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उच्च माध्यमिक शाळेतील वाढीव पदांना अनुदान देण्याबाबत

**(३१) * ६८८७ डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उच्च माध्यमिक शाळेतील व्यपगत पदे व सन २०१९ पर्यंतच्या वाढीव पदांना अनुदान देण्यासाठी उच्चस्तरीय सचिवांच्या समितीऐवजी मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव सादर करून अनुदान देण्याबाबत मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाढीव पदांच्या नस्तीमध्ये विधी व न्याय विभागाने काढलेल्या त्रुटी पूर्ण करण्यासाठी संचालक, शालेय शिक्षण यांच्याकडे ६ महिन्यांपासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू अटींची पूर्तता करणाऱ्या शाळेतील वाढीव पदांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील खाजगी मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळातील सन २००३-२००४ ते २०१०-२०११ या कालावधीतील व्यपगत केलेल्या पदांना पुनर्जिवीत करण्याबाबत तसेच सन २०११-२०१२ ते २०१८-२०१९ मधील कार्यभार वाढल्यामुळे उच्च माध्यमिक शाळांतील वाढीव पदांना मान्यता देण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्याबाबत तत्कालीन मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांनी निर्देश दिले होते.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) राज्यातील खाजगी मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळांतील सन २००३-२००४ ते २०१०-२०११ चा कालावधीतील व्यपगत केलेल्या पदांना पुनर्जिवीत करण्याबाबत तसेच सन २०११-२०१२ ते २०१८-२०१९ मधील कार्यभार वाढल्यामुळे उच्च माध्यमिक शाळांतील वाढीव पदांना मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर तपासण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील कमी भारमान असलेल्या एसटीच्या फेऱ्या नियमित सुरु ठेवण्याबाबत

**(३२) * ७०२० श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३० टक्क्यांपेक्षा कमी भारमान असलेल्या एसटीच्या फेऱ्या रद्द करण्याचे आदेश एसटी महामंडळाने काढल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुर्गम-अतिदुर्गम भागातील कमी लोकसंख्या असलेल्या खेड्यातील, वाडीतील गोर-गरीबांना गाव-तालुका जिल्ह्यांशी जोडण्याकरीता एसटी प्रवास हा एकच मार्ग असल्याने कमी भारमानाच्या एसटीच्या फेऱ्या रद्द झाल्यास गावकऱ्यांना खाजगी वाहनाने प्रवास करणे शक्य नसल्याने त्यांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन एसटी महामंडळाने घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करुन दुर्गम-अतिदुर्गम भागातील एसटीच्या फेऱ्या रद्द न करण्याकरीता कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) राज्यातील दुर्गम-अतिदुर्गम भागातील कमी लोकसंख्या असलेल्या खेड्यातील, वाडीतील राज्य परिवहन महामंडळाच्या बसफेऱ्या नियमित चालविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना शैक्षणिक शुल्काची प्रतिपुर्ती मिळणेबाबत

**(३३) * ६३९२ श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना मोफत शिक्षण योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमाची शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती शिक्षण शुल्क समितीच्या मान्य शुल्कानुसार दिली जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षण शुल्क समितीने निश्चित केल्याप्रमाणे शुल्क देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) अंशत: खरे आहे.

(२) राज्यातील अनुदानित अशासकीय माध्यमिक शाळांतील तसेच उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना शासन निर्णय, दिनांक १९ ऑगस्ट, १९९५ अन्वये योजना लागू असून त्यामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमाबाबत ही सवलत प्रमाणित फी पुरतीच अनुज्ञेय आहे. त्याप्रमाणे पात्र विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य देण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठांतर्गत ठाणे उपकेंद्रातील एलएलबीच्या विद्यार्थ्यांना गुणपत्रिका देण्याबाबत

**(३४) * ७६१८ श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठांतर्गत ठाणे येथील विद्यापीठ उपकेंद्रामध्ये मागील ४ वर्षापासून ३६ विद्यार्थी एलएलबीचे शिक्षण घेत असून सदरहू विद्यार्थ्यांना एकाही वर्षाची गुणपत्रिका देण्यात आली नसून केवळ सूचना फलकाव्दारे निकाल जाहीर केल्याचे दिनांक ५ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकाल जाहीर करताना विद्यार्थ्यांना एटीकेटी (अलाऊड टू कीप टर्म) लागली आहे किंवा नाही याची नोंद नसल्याने अनेक विद्यार्थ्यांकडून विद्यापीठ उपकेंद्राने गुणपत्रिका पुन्हा तपासणीसाठी प्रति विद्यार्थी रुपये ९९९/- इतके शुल्क घेतल्यानंतर सदर विद्यार्थी उत्तीर्ण असल्याचे समजल्याने विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याच्या तक्रारी

विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठ प्रशासनाकडे तसेच मा.गृहनिर्माण मंत्री व मा.पालकमंत्री, ठाणे जिल्हा यांचेकडे केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील चार वर्षापासून गुणपत्रिका न मिळाल्यामुळे अनेक विद्यार्थी वकिलांची सनद मिळविण्यापासून वंचित राहिल्यामुळे सदरची संभ्रमावस्था दूर करण्यासाठी विद्यापीठ उपकेंद्रामध्ये स्वतंत्र विधी शाखा अभ्यासक्रम (Separate faculty) निर्माण करण्यात यावी अशी मागणी विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठ प्रशासनाकडे केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्वतंत्र विधी शाखा अभ्यासक्रम निर्माण करण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सदर उपकेंद्रात विधी शाखा स्वतंत्र असून “स्कूल ऑफ लॉ, ठाणे उपकेंद्र” या नावाने सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यात राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान देण्याबाबत

**(३५) * ७९१५ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा अपघात झाल्यास अथवा अपघातात विद्यार्थी मृत झाल्यास शासनाच्या शिक्षण विभागाने राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना लागू केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेमध्ये अपघातामुळे शरीराचा एक अवयव किंवा एक डोळा निकामी झाल्यास रुपये ३०,०००/- व दोन अवयव किंवा दोन्ही डोळे निकामी झाल्यास रुपये ५०,०००/- तसेच अपघाती मृत्यू झाल्यास रुपये ७५,०००/- इतके सानुग्रह अनुदान दिले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बीड जिल्हयात सन २०१९-२०२० मध्ये २५ व सन २०२०-२०२१ मध्ये २६ असे एकूण जवळपास ५१ पालक उक्त योजनेमार्फत मिळणाऱ्या अनुदानाच्या प्रतिक्षेत असून सन २०२०-२०२१ मध्ये दाखल झालेल्या २६ प्रस्तावांकरीता रुपये १९ लक्ष ५० हजार निधी लागणार असून सदरहू प्रस्तावांना जिल्हास्तरावरुन मान्यता मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्तिवेतन व भविष्य निर्वाह निधी योजनेचा लाभ देण्याबाबत

**(३६) * ६८९२ श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामदास आंबटकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम क्र. १९ अन्वये सेवानिवृत्तिवेतन योजनेचा व नियम क्र. २०(२) अन्वये भविष्य निर्वाह निधी योजनेचा लाभ खाजगी शाळेतील शिक्षक व

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देय असून सदर योजनेच्या लाभापासून वंचित करणारा असंवैधानिक शासन निर्णय शासनाने दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० रोजी निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर असंवैधानिक शासन निर्णयाला महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने व नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी माहे जुलै, २०११ पासून आक्षेप व हरकती नोंदविल्यामुळे शासनाने आक्षेप व हरकती रद्द करण्यासाठी नियम १९ व नियम २०(२) मध्ये सुधारणा प्रस्तावित करणारी अधिसूचना दिनांक १० जुलै, २०२० रोजी प्रकाशित केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अधिसूचनेला महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने व नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी आक्षेप व हरकती घेतल्यानंतर त्याबाबतचे निवेदने वजा अपील मा.सभापती व मा.राज्यपाल महोदयांकडे सादर करुन दिनांक १० ऑगस्ट, २०२० रोजी आंदोलन केल्याने सदर अधिसूचनेला घेतलेले आक्षेप/हरकती/निवेदने व आंदोलनाची दखल घेवून शासनाने सदर अधिसूचना दिनांक ११ डिसेंबर, २०२० रोजी रद्द घोषित केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, नियम क्र.१९ व नियम क्र. २०(२) नुसार शिक्षक/कर्मचाऱ्यांना देय असलेला सेवा निवृत्तिवेतन व भविष्य निर्वाह निधीचा लाभ कायम असून शासन निर्णय दिनांक २९ नोव्हेंबर, २०२० अन्वये शिक्षक/कर्मचाऱ्यांना सेवा निवृत्तिवेतन व भविष्य निर्वाह निधीच्या लाभापासून वंचित ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन असंवैधानिक निर्णय रद्द घोषित करून राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियम १९ नुसार निवृत्तिवेतन योजना व नियम २०(२) भविष्य निर्वाह निधी योजनेचा लाभ पूर्ववत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे नाही.

ज्यांना सध्याची निवृत्तिवेतन योजना (महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तिवेतन नियम १९८२) लागू होती अशा मान्यताप्राप्त अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील सेवेत

दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती शासन निर्णय दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० अन्वये विहित केली आहे.
(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम क्र.१९ व नियम क्र. २०(२) मध्ये करावयाच्या सुधारणेस पूर्वप्रसिध्दी देण्यासाठी अधिसूचना दिनांक १० जुलै, २०२० रोजी प्रकाशित केली.
(३), (४) व (५) सदर दिनांक १० जुलै, २०२० रोजीची अधिसूचना शासनाने दिनांक ११ डिसेंबर, २०२० रोजी मागे घेतली आहे. ज्यांना सध्याची निवृत्तिवेतन योजना (महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तिवेतन नियम १९८२) लागू होते अशा मान्यताप्राप्त अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील सेवेत दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना परिभाषित अशंदान निवृत्तिवेतन योजना लागू होते. यासंबंधीची कार्यपध्दती शासन निर्णय दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० अन्वये विहित केली असून हा शासन निर्णय मा.उच्च न्यायालयाने ग्राह्य ठरवला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तिरोडा-धापेवाडा-गोंदिया (ता.तिरोडा, जि.गोंदिया) बससेवा पूर्ववत सुरु करण्याबाबत

**(३७) * ७३२३ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तिरोडा-धापेवाडा-गोंदिया (ता.तिरोडा, जि.गोंदिया) मार्गावरील माहे मार्च, २०२० मध्ये लॉकडाऊनमुळे बंद करण्यात आलेली बससेवा लॉकडाऊन शिथिल केल्यामुळे पुन्हा सुरु करण्याची मागणी ग्रामीण भागातील नागरिक, विद्यार्थी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी तिरोडा बस आगार यांचेकडे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बससेवा बंद असल्यामुळे शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची तसेच दैनंदिन प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तिरोडा-धापेवाडा-गोंदिया बससेवा पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) तिरोडा-धापेवाडा-गोंदिया मार्गावर प्रवासी व विद्यार्थी यांचे मागणीनुसार राज्य परिवहन बसफेऱ्या नियमित सुरु आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणेबाबत

**(३८) * ७०९३ श्री.कपिल पाटील, डॉ.रणजित पाटील, श्री.सुरेश धस, श्री.जयंत आसगावकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.बाळाराम पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामदास आंबटकर, ॲड.निरंजन डावखरे : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ८ मधील प्रश्न क्रमांक ५१२८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्राथमिक शिक्षक वगळता माध्यमिक प्रशिक्षकांसह इतर सर्व राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगानुसार १० वर्षे, २० वर्षे व ३० वर्षे सेवेनंतर कालबध्द वेतनश्रेणी लागू करण्यात आली असून राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच जिल्हा परिषद शाळेतील प्राथमिक

शिक्षकांना १०, २० व ३० वर्षाची आश्वासित प्रगती योजना अद्यापी लागू झाली नाही तसेच खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील सर्व शाळा व अध्यापक विद्यालयातील कर्मचाऱ्यांना १० वर्षे, २० वर्षे व ३० वर्षानंतरची कालबद्ध वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शासनाने आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास करण्यासाठी दिनांक ३१ जुलै, २०१९ रोजी समिती स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक ३१/०८/२०२० रोजी पत्र पाठवून अहवाल त्वरीत सादर करण्याची विनंती केली असून सदरहू आश्वासित प्रगती योजना शिक्षकांना लागू करण्याबाबत शासनाने नेमलेल्या अभ्यासगटाने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, सदरहू अभ्यासगटाच्या अहवालाची शिफारस काय आहे व त्यावर कोणता निर्णय घेण्यात आला, तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सदर योजना लागू करण्याबाबत शिक्षक संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांच्याकडून प्राप्त प्रस्तावाची छाननी पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करणेबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी याकरीता मा.मंत्री यांनी सभागृहास आश्वासित करूनही शिक्षकांना सदरहू योजना लागू झाली नाही, तसेच, राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी आकृतिबंधाच्या निकषानुसार अंमलबजावणी होऊन सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लाग करावी, अशी मागणी कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार सहाव्या वेतन आयोगातील त्रुटींची दुरुस्ती करुन उक्त समितीने शासनास अहवाल सादर केला असल्यास खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील व अध्यापक विद्यालयातील कर्मचाऱ्यांना तसेच जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना सदर वेतनश्रेणी लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१), (२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

राज्य शासकीय व अन्य कर्मचाऱ्यांप्रमाणे तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना खाजगी व्यवस्थापनेच्या शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना लागू करणे व इतर बाबींच्या अनुषंगाने अभ्यास गट दिनांक ३१/७/२०१९ रोजी गठित करण्यात आलेला असून सदर समितीचा अहवाल प्राप्त झाला असून तो तपासण्यात येत आहे. तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १० वर्षे, २० वर्षे व ३० वर्षानंतरची कालबद्द वेतनश्रेणी लागू करण्यासाठीचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील स्थलांतरित मजुरांच्या मुलांना प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था करण्याबाबत

**(३९) * ७६८३ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दौंड, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ऊसतोड कामगार, वीटभट्टीमधून दगडखाण व बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या स्थलांतरित मजुरांच्या मुलांच्या प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था शासनाने करावी अशी मागणी स्वयंसेवी संस्थांनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनाच्या संसर्गामुळे सध्या शाळा बंद असल्यामुळे स्थलांतरित मुलांना शालेय पोषण आहारासह मास्क, सॅनिटायझर, पाठयपुस्तके व शैक्षणिक साहित्य मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार स्थलांतरित मुलांचा सर्व्हे करुन त्यांना पोषण आहार व इतर वस्तू उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

सर्व मुलांना पाठ्यपुस्तके शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीस वाटप करण्यात आलेले आहे.
(३) शिक्षण विभागातील बालरक्षकांमार्फत स्थलांतरित व शाळाबाह्य मुलांचे शोध घेण्यात येत आहे. तसेच स्थलांतरित मुलांचे सर्वेक्षण करणे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेतलेल्या परिक्षेच्या निकालात गैरप्रकार झाल्याबाबत

**(४०) * ६४८० श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेतलेल्या ऑनलाईन आणि ऑफलाईन (प्रत्यक्ष) परिक्षेच्या जाहीर केलेल्या निकालात परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांपैकी सुमारे १८ हजार विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेवर अनुपस्थित शेरा नमुद केल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२० च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ८९ मध्ये नमूद केलेल्या कालमर्यादेमध्ये निकाल जाहीर करण्याच्या दृष्टीने तांत्रिक अडचणी असलेल्या विद्यार्थ्यांचे निकाल स्थगित ठेवून अशी प्रकरणे परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या सभेसमोर सादर करुन प्राप्त आदेशानुसार

निकाल सुधारीत केले आहेत व त्यानुसार विद्यार्थ्यांना गुणपत्रके वितरित करण्यात आली आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक नुकसान झालेले नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांना वेतन अदा करण्याबाबत

**(४१) * ६५७१ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांना लॉकडाऊन सुरू झाल्यापासून सात ते आठ महिन्यांचे वेतन मिळाले नसून दुसरीकडे ऑनलाईन शिक्षण सुरू असल्याने काही शिक्षकांना अतिरिक्त झाल्याचे सांगून नोकरीवरुन कमी केल्यामुळे सदरहू शिक्षकांची व त्यांच्या कुटुंबियांची उपासमारीमुळे बिकट अवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांचे प्रलंबित वेतन देण्याचे आदेश निर्गमित करावे अशी मागणी शिक्षकांच्या 'मुक्ता' संघटनेने मा.मुख्यमंत्री, मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू आदींकडे एका निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांच्या सदरहू मागणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) हे अंशतः खरे आहे.
(३) अशा प्रकारची तक्रार "मुक्ता" संघटनेकडून मुंबई विद्यापीठाकडे प्राप्त झाली असून, याबाबत विद्यापीठ स्तरावरून कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय तसेच स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात नियामक मंडळाची नियुक्ती करण्याबाबत

**(४२) * ६३५६ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय तसेच स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाचे कामकाज पाहणारे नियामक मंडळ बरखास्त केल्यानंतर नवीन नियामक मंडळाची नियुक्ती करण्यात न आल्याने महाविद्यालयाचे कामकाज प्रलंबित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय तसेच स्वायत्त महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या उद्देशाने शिक्षण, उद्योग, प्रशासकीय व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांची निवड करून नियामक मंडळाची स्थापना केली जात असतानाही १ वर्षाहून अधिक कालावधी होवूनही नियामक मंडळाची स्थापना न करण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच, महाविद्यालयाच्या नियामक मंडळाच्या नियुक्तीचा प्रस्ताव तंत्र शिक्षण संचालनालयाने यापूर्वीच शासनाकडे सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईतील व्हीजेटीआय स्वायत्त महाविद्यालयासह सात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयावर शासनामार्फत विनाविलंब नियामक मंडळाची नियुक्ती करण्याच्या दृष्टीने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात आला आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१), (२), (३) व (४) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या स्वायत्तेबाबतच्या मार्गदर्शक सूचना आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था आणि संचलित किंवा घटक

महाविद्यालये यांना स्वायत्ता देण्याबाबतची मानके) एकरूप परिनियम, २०१८ मधील तरतूदीनुसार शिक्षण, उद्योग, प्रशासकीय व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांची निवड करुन नियामक मंडळाची स्थापना करण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बेकायदेशीर बाटलीबंद पाण्याच्या व्यवसायाबाबत

**(४३) * ७४८५ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र बॉटल वॉटर मॅन्युफॅक्चर असोसिएशनने राष्ट्रीय हरित लवादात (एनजीटी) याचिका दाखल करुन नियमावलीची तसेच बेकायदेशीर उद्योगावर कारवाईची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात ८९० बाटलीबंद पाण्याचे प्रकल्प नोंदणीकृत असून ५००० पेक्षा अधिक प्रकल्प बेकायदेशीररीत्या सुरू असल्याचे राष्ट्रीय हरित लवादाकडे केलेल्या याचिकेतून निदर्शनास आले असून अवैध प्रकल्पामध्ये आय.एस.आय., बी.आय.एस., एफ.एस.एस.आय. मानांकने आवश्यक असताना त्याची टेस्टींग केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नामांकित कंपन्यांच्या नावाचे बाजारातून केवळ बाटलीचे झाकण खरेदी करून ते बाटल्यांना लावून त्याची विक्री केली जात असल्याने प्लास्टीक कचरा समस्या व भुजलाचा अतिरिक्त उपसा या समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अधिकृत कंपन्यांचे बनावट आय.एस.आय. क्रमांक, एफ.एस.एस.आय. क्रमांक ब्रॅन्डचा बेकायदेशीर वापर होत असून एनजीटीने दिलेल्या आदेशानुसार विनापरवाना व बेकायदेशीर कुल जार प्रकल्प त्वरीत बंद करण्याचे आदेश महाराष्ट्र प्रदूषण मंडळ, अन्न व औषध प्रशासन, महानगरपालिका, नगरपालिका व ग्रामपंचायत यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेकायदेशीर बाटलीबंद पिण्याच्या पाण्याचा दर्जा कायम रहावा तसेच ग्राहकांची फसवणूक थांबावी हा उद्देश सफल होण्याकरीता जिल्हा स्तरावरील प्रदूषण नियंत्रण मंडळ व स्थानिक प्रशासनाने अवैध पाण्याच्या व्यवसायावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) मा.राष्ट्रीय हरित लवाद, पुणे येथे मूळ अर्ज क्र. ७५/२०१५ या प्रकरणी मा.लवादाने दिनांक १९/०६/२०२० व दिनांक १९/१०/२०२० रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन मा.मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत केंद्रीय भूजल प्राधिकरण आणि अन्न व औषध प्रशासनाच्या ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय सुरु असणारे थंड पाण्याचे जार/कॅन उत्पादन करणारे प्रकल्प सील करण्याबाबत दिनांक २६/१०/२०२० रोजी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना निर्देश देण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## अंबरनाथ व उल्हासनगर (जि.ठाणे) शहरातून वाहणाऱ्या वालधुनी नदीपात्रातील प्रदूषण रोखण्याबाबत

**(४४) * ७९०७ श्री.रविंद्र फाटक, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हास व वालधुनी नदीचे प्रदूषण औद्योगिक वसाहतीतील कंपन्या आणि औद्योगिक सांडपाण्यामुळे होत असून उल्हासनगरातील शहाडजवळ सेंच्युरी कंपनीच्या सुरक्षा विभागाने कंपनीच्या प्रवेशव्दाराजवळ असलेल्या सांडपाण्याच्या नाल्यात रसायने सोडणाऱ्या एका टँकरला पकडून स्थानिक पोलीस ठाण्याच्या स्वाधीन केल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, अंबरनाथ व उल्हासनगर (जि.ठाणे) शहरातून वाहणाऱ्या वालधुनी नदीत औद्योगिक आणि नागरी सांडपाणी सोडल्यामुळे नदीपात्रात पाणी प्रदूषित होऊन सर्वत्र दुर्गंधी पसरल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अंबरनाथ येथील स्थानिक नागरिकांनी अंबरनाथ नगरपालिकेकडे लेखी तक्रारी केल्या आहेत तसेच, उल्हासनगर पोलीस ठाण्यामार्फत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना याबाबतची माहिती लेखी स्वरूपात देवूनही याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांकडून दिरंगाई होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अंबरनाथ व उल्हासनगर शहरातून वाहणाऱ्या वालधुनी नदीत प्रदूषित पाणी सोडणाऱ्या औद्योगिक कंपनी/वसाहतीवर कारवाई करुन नदीपात्रातील प्रदूषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व अंबरनाथ नगरपरिषदेमार्फत दिनांक १०/०१/२०२१ व दिनांक ११/०१/२०२१ रोजी शिवमंदीर, अंबरनाथ जवळील वालधुनी नदीच्या करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान सदर घटनेस जबाबदार असणाऱ्या मे.बायोक्झिरा फार्मा प्रा.लि. उद्योगास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक १३/१/२०२१ रोजी उत्पादन बंदचे आदेश देण्यात आले असून सदर उद्योगाविरुध्द दिनांक १३/१/२०२१ रोजी शिवाजी नगर पोलीस स्टेशन, अंबरनाथ येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अनधिकृतपणे रसायने पाण्यात सोडून पाणी प्रदूषण करणे, नागरिकांच्या तसेच पशुपक्षी व जैवसंपत्तीच्या आरोग्यास बाधक स्थिती निर्माण करणे यासारखा उपद्रव निर्माण करणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत अंबरनाथ नगरपरिषदेने दिनांक १३/०१/२०२१ रोजी शिवाजीनगर पोलीस स्टेशन, अंबरनाथ यांना कळविले होते.

वालधुनी व उल्हास नदी प्रदूषणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत अंबरनाथ/बदलापूर मधील उद्योगांचे सर्वेक्षण करण्यात आले असून त्यामध्ये त्रुटी आढळून आलेल्या उद्योगांना जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) कायदा, १९७४ मधील तरतूदीनुसार कारवाई करण्यात आलेली आहे.

वालधुनी व उल्हास नदीमध्ये विनाप्रक्रिया सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्याच्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिका, अंबरनाथ नगरपरिषद, कुळगाव-बदलापूर नगरपरिषद व कल्याण-डोंबिवली महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक २४/११/२०२० व १८/१२/२०२० रोजी निर्देश दिले आहेत. तसेच नाल्यामध्ये विनाप्रक्रिया जात असलेल्या घरगुती सांडपाण्यावर तातडीने अल्पकालीन व्यवस्था (Short term Measures) करण्याकरीता नाला-ईन-सीटू संयंत्रणा (Nalla-in-situ treatment) उभारण्याबाबत देखील निर्देश देण्यात आले आहेत.

उल्हास नदी प्रदूषणाच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयात सिव्हिल अपिल क्र. १०५८२/२०१७ (उल्हासनगर महानगरपालिका वि. वनशक्ती पब्लिक ट्रस्ट) दाखल करण्यात आले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील इमारतीचे बांधकाम व दुरुस्तीच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४५) * ७४३८ श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील इमारतीचे बांधकाम व दुरुस्तीच्या कामात लाखो रूपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपूर्ण प्रकरणात गोपनीयता बागळण्यात येत असून चौकशी करण्यात आली नाही तसेच चौकशी समितीव्दारा इमारतीचे बांधकाम व दुरुस्ती करणाऱ्या कंत्राटदाराची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार विद्यापीठाच्या इमारतीचे बांधकाम व दुरुस्तीच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) ज्ञानस्त्रोत केंद्र रामदास पेठ येथे झालेल्या बांधकामाची तपासणी करण्याकरीता विद्यापीठाकडून सत्यशोधन समिती गठित करण्यात आलेली आहे. सदर समितीकडून सदर विषयी कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उजनी पर्यटन केंद्र उभारण्याबाबत

**(४६) * ७३६० श्री.प्रशांत परिचारक, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उजनी धरणाचे काम पूर्ण होऊन ४० वर्षाचा कालावधी होवूनही अद्यापपर्यंत उजनी पर्यटन केंद्र तयार झाले नसल्याने पर्यटकांना अजूनही प्रतिक्षा करावी लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उजनी धरणाच्या पायथ्यास उजव्या तीरावर असलेली ४३.२६ हेक्टर जमीन धरणाच्या मूळ आराखड्यात पैठण येथील ज्ञानेश्वर उद्यान व म्हैसूर येथील वृंदावन उद्यानाच्या धर्तीवर उद्यान तयार करण्यासाठी आरक्षित केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उजनी येथील उद्यान उभारण्यास महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व राज्य शासन दुर्लक्ष करित असल्यामुळे उद्यानाचे काम अद्याप प्रलंबित असून सदर प्रलंबित उद्यान तात्काळ उभारल्यास बोटींग व कृषी पर्यटनाची निर्मिती होवून अनेक बेरोजगारांना रोजगार मिळण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त उद्यानाचे विठ्ठल रखुमाई उद्यान असे नामकरण करुन राज्यातील सर्वात सुंदर पर्यटन केंद्र उभारण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, अंशतः खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर संपादित जमिनीवर अतिक्रमण केलेल्या स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध तसेच निधीच्या अनुपलब्धतेमुळे कामास सुरुवात होऊ शकली नाही.

धरणक्षेत्रानजीकच्या अतिरिक्त जमिनी Public Private Partnership (PPP) या तत्वावर खाजगी यंत्रणाकडून विकसित करण्याच्या धोरणानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हा परिषदेंतर्गत येणाऱ्या शाळांचे वीज देयक प्रलंबित असल्याबाबत

**(४७) * ६७९१ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेंतर्गत येणाऱ्या अनेक शाळांचे वीज देयक प्रलंबित असल्यामुळे वीज पुरवठा खंडीत केल्याचे तसेच डिजिटलायझेशन झालेल्या शाळांमध्ये अनेक ठिकाणी डिजिटल साहित्यांचा वापर होत नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) व (२) नागपूर जिल्हा परिषदेच्या शाळांची थकीत वीज देयकाची रक्कम अदा करण्यासाठी रुपये १,२५,६७१/- इतकी रक्कम महावितरण यांना अदा करण्यात आली आहे. वीज पुरवठा पूर्ववत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिक्षण विभागात बेकायदेशीर शिक्षक भरती करून गैरव्यवहार केल्याबाबत

**(४८) * ७९२२ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०११ नंतर शिक्षक भरतीवर बंदी असतानाही शिक्षण विभागातील अधिकारी व शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी संगनमत करुन बनावट कागदपत्रांच्या आधारे बेकायदा शिक्षक भरती करुन गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षकांच्या बेकायदेशीर भरती प्रकरणातील मुख्य सूत्रधार संभाजी शिरसाठ, मुख्याध्यापक यांच्या बँक खात्यावर मागील तीन ते चार वर्षात दोन ते तीन कोटींचे बँक व्यवहार झाल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत अधिक चौकशी करण्याकरीता पुणे आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला (एसीबी) अहवाल दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच, चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) अंशतः खरे आहे.
(२), (३) व (४) याबाबत पुणे जिल्ह्यातील एका प्राथमिक शाळेतील बनावट शिक्षक नियुक्तीसंदर्भात बंडगार्डन पोलीस ठाणे, पुणे येथे एकूण ५ अधिकारी व अन्य २३ जणांविरुध्द गुन्हा क्र.४०३/२०१९, दिनांक १४/१०/२०१९ रोजी दाखल करण्यात आला. गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंचगंगा नदी (जि.कोल्हापूर) दूषित झाल्याबाबत

**(४९) * ६६१८ श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्याची जीवनवाहिनी म्हणून ओळखली जाणारी पंचगंगा नदी प्रदूषणामुळे दूषित झाल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सांडपाण्यावर योग्य प्रक्रिया न करता ते पाणी पंचगंगेत सोडणारे, नदी प्रदूषण नियंत्रणासंदर्भातील नियमांचे उल्लंघन करणारे उद्योग व कारखाने या प्रदूषणास जबाबदार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पंचगंगा नदीचे प्रदूषण रोखण्यासंदर्भात उपाययोजना करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) डिसेंबर, २०२० मध्ये तेरवाड येथे झालेल्या मासे मर्तुकीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत इचलकरंजी शहरातील कापडावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांची तसेच इचलकरंजी नगरपालिकेच्या सांडपाणी प्रक्रिया व्यवस्थेची दिनांक २७/१२/२०२० ते ३१/१२/२०२० दरम्यान पाहणी करण्यात आलेली असून, पाहणी दरम्यान दोषी आढळलेल्या १७ उद्योगांवर बंदची कारवाई व ३७ उद्योगांवर कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

इचलकरंजी नगरपालिका यांच्याकडे अपूरी सांडपाणी प्रक्रिया असलेने व घरगुती सांडपाणी शेजारील काळया ओढयाव्दारे पंचगंगा नदीत मिसळत असल्याकारणाने दिनांक २४/१२/२०२० रोजी जल प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ अन्वये निर्देश बजावले आहेत. तसेच त्यांच्यावर पुन:श्च न्यायालयात खटला दाखल करणेची कारवाई प्रस्तावित आहे.

पंचगंगा नदी प्रदूषणाच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०५/०१/२०२१ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये पंचगंगा नदी प्रदूषण कमी करण्याच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार विभागीय आयुक्त, पुणे, जिल्हाधिकारी, कोल्हापूर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, इचलकरंजी नगरपालिका यांच्याकडून कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विदर्भातील धान खरेदी केंद्रावरील एकरी खरेदी मर्यादेत वाढ करण्याबाबत

**(५०) * ७८७२ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली व वर्धा जिल्ह्यात शासनाने आधारभूत धान खरेदी केंद्रावर एकरी खरेदी मर्यादा १२ क्विंटल ऐवजी ९.६० क्विंटल केल्याचे दिनांक ०३ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात धान उत्पादन होत असल्याने सदर मर्यादा वाढविण्याबाबत अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार शेतकऱ्यांवरील आर्थिक संकट दूर करण्याकरीता सदर मर्यादा वाढवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय, दिनांक २९ सप्टेंबर, २०२० नुसार अभिकर्ता संस्थांमार्फत संबंधित जिल्ह्यातील कृषी विभागाकडून निश्चित केलेल्या सरासरी उत्पादकतेनुसार धानाची खरेदी करण्यात येते.

कृषी विभागाने पणन हंगाम २०२०-२०२१ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यात प्रति एकरी १०.७६ क्विंटल, भंडारा जिल्ह्यात प्रति एकरी १४.८ क्विंटल, गोंदिया जिल्ह्यात प्रति एकरी १३.४५ क्विंटल व गडचिरोली जिल्ह्यात प्रति एकर ९.६० क्विंटल इतकी उत्पादकता निश्चित केली आहे. त्यानुसार चालू हंगामात अभिकर्ता संस्थांमार्फत धान खरेदी करण्यात येत आहे.

(२) गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी उत्पादकता वाढीबाबत आंदोलन करण्यात येत असल्याबाबत जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना कळविण्यात आले होते.

(३) शासन निर्णय, दिनांक २९ सप्टेंबर, २०२० अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार संबंधित जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचेकडून प्राप्त जिल्ह्याच्या सरासरी उत्पादकतेच्या मर्यादेत धान खरेदी करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोरोना काळात रोजगार मिळालेल्यांची सविस्तर माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५१) * ६८१८ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाच्या काळात बेरोजगारीची समस्या निर्माण झाल्याने कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाने लॉकडाऊनच्या काळात जिल्ह्याजिल्ह्यात आयोजित केलेले ऑनलाईन रोजगार मेळावे तसेच महास्वयं वेब पोर्टलमार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांच्या आधारे राज्यात माहे नोव्हेंबर, २०२० अखेरपर्यंत १ लाख ३२ हजार ३०८ इतक्या बेरोजगारांना रोजगार मिळाला असल्याची प्रसिध्दी मा.कौशल्य विकास मंत्री यांनी दिनांक १६ डिसेंबर, २०२० रोजी त्यांच्या अधिकृत फेसबुक पेजवर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त नमूद १ लाख ३२ हजार ३०८ युवकांना मिळालेल्या रोजगाराची जिल्हानिहाय, पदनिहाय, कंपनीनिहाय सविस्तर माहिती उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रोजगाराची सविस्तर माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्नच उद्भवत नाही.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## तारापूर व बोईसर (जि.पालघर) येथील जलस्त्रोत प्रदूषित झाल्याबाबत

**(५२) * ७००० श्री.जयंत पाटील, श्री.रामनिवास सिंह, श्री.रविंद्र फाटक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर व बोईसर (जि.पालघर) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामधील रसायनयुक्त पाणी जमिनीत झिरपल्याने नैसर्गिक जलस्त्रोत दूषित होवून तसेच कारखान्यांनी चुकीच्या मार्गाने प्रदूषित रसायन सोडल्यामुळे या परिसरातील विहिरी, बोअरिंग, खाड्या, तलाव तसेच अन्य पाण्याचे स्त्रोत दूषित झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तारापूर परिसरातील १६ गावांमधील ८६ सार्वजनिक व ५३५ खाजगी पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे नमुने उपविभागीय प्रयोगशाळा डहाणू येथे पाठविले असता सुमारे ५ सार्वजनिक व ६१ खाजगी पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत रासायनिकदृष्टया दूषित असल्याचे निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, विहिरी, बोअरिंग, तलाव प्रदूषित झाल्याने दूषित पाण्यामुळे तेथील शेतजमीन नापीक झाली असून, हजारो ग्रामस्थांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याने नागरीकांना कॅन्सर, किडणीसंबंधित आजार, त्वचा रोग तसेच अस्थमा आदी गंभीर आजार होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर घातक रसायनयुक्त पाणी नदी, नाले वा तलावात सोडण्याची परवानगी देणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत तारापूर व बोईसर येथील उद्योगांच्या केलेल्या पाहणीदरम्यान दोषी आढळलेल्या उद्योगांवर तसेच सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणेवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कारवाई केलेली आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून तारापूर औद्योगिक वसाहतीस करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्यामध्ये कपात करण्यात आली आहे.

तारापूर औद्योगिक परिसरातील प्रदूषणाच्या अनुषंगाने मा.हरित लवाद यांच्याकडे याचिका क्र. ६४/२०१६ दाखल प्रकरणी मा.लवादाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार तारापूर औद्योगिक वसाहतीमधील प्रदूषण कमी करण्यासाठी पर्यावरण गुणवत्ता सुधारणे व स्थानिक रहिवाशांसाठी योग्य त्या आरोग्य सेवा पुरविणे इत्यादी बाबींसाठी कृती आराखडा बनवून मा.राष्ट्रीय हरित लवादास सादर करण्यात आला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. तसेच सदर कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची कार्यवाही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळामार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याबाबत

**(५३) * ६७४२ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.मोहनराव कदम, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.महादेव जानकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना काळात मुंबईतील बहुतांश शाळांनी पालकांकडून अतिरिक्त शुल्क वसूली केल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले तसेच, टाळेबंदीमुळे प्रलंबित असलेली प्रवेशप्रक्रिया, शुल्कासाठी शाळांकडून होणारी अडवणूक इत्यादी कारणांमुळे शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांना ज्या सुविधा आवश्यक नाहीत तसेच ज्या सुविधांचा वापर विद्यार्थी करीत नाहीत अशा सुविधांची शुल्क वसूली शाळा प्रशासन करीत असून आरटीईच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मोफत देण्याची तरतूद शिक्षण हक्क कायद्यात असतानाही शाळा विद्यार्थ्यांना साहित्य देण्यास अडवणूक करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रवेश निश्चित करुनही पालकांनी तिमाही शुल्क उशीरा भरल्याने शाळांनी डिजिटल ॲप्लीकेशन विद्यार्थ्यांना वापरु देणार नाही असा इशारा पालकांना दिला असून शुल्क न भरल्याने त्यांना ऑनलाईन शिक्षणात सहभागी करुन न घेणे, तसेच हजारो विद्यार्थ्यांना प्रतिक्षा यादीत ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार कोरोना काळातील अतिरिक्त शुल्कांमध्ये सवलत देण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाव्दारे इयत्ता १ ली ते १० वीच्या विद्यार्थ्यांकरीता ४० झुम चॅनल्स व ४० यु-टयुब चॅनल्स तयार करण्यात आली आहेत. विद्यार्थी यु-ट्युबच्या माध्यमातून ऑनलाईन अभ्यासाचा लाभ घेत आहेत.

सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षामध्ये आरटीई २५ टक्के अंतर्गत ८६९७५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नेरुळ (नवी मुंबई) येथील ऑगस्टीन शाळेवर कारवाई करण्याबाबत

**(५४) * ७७७० श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरुळ, नवी मुंबई येथील ऑगस्टीन शाळेचे शुल्क न भरल्यामुळे विद्यार्थ्यांना ऑनलाईन वर्गातून बाहेर काढल्याचे माहे जानेवारी, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळेने ऑनलाईन वर्गातून अनेक विद्यार्थ्यांना वगळण्यात आल्याच्या तक्रारी शिक्षण विभागाकडे आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळेतील पालकांनी महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडे केलेल्या तक्रारीनुसार सदरहू शाळेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

शिक्षण विभाग, नवी मुंबई महानगरपालिका कार्यालयात तक्रार प्राप्त झाली आहे.

(३) व (४) नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत शाळेला पत्र देवून ऑनलाईन शिक्षणापासून एकही विद्यार्थी वंचित राहणार नाही अशा सक्त सूचना शाळेला देण्यात आल्या आहे. त्यानुषंगाने कोणत्याही विद्यार्थ्यांस ऑनलाईन शिक्षणापासून वंचित ठेवलेले नाही असे शाळेने लेखी पत्राने शिक्षण विभाग, नवी मुंबई महानगरपालिका यांना कळविले आहे.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या अखत्यारीतील महाविद्यालयांतील प्राध्यापकांची पदोन्नती प्रलंबित असल्याबाबत

**(५५) * ६५८८ श्री.विलास पोतनीस, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या अखत्यारीतील महाविद्यालयांतील प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठी आवश्यक 'कॅश' शिबीर लावले जात नसल्याने, तसेच वेळेत तज्ञ समिती उपलब्ध होत नसल्याने प्राध्यापकांची पदोन्नती प्रलंबित असल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून झाले, तदनुसार मुंबई विद्यापीठाच्या अखत्यारीतील महाविद्यालयातील प्राध्यापकांची पदोन्नती विहित कालावधीत होण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) शिक्षकांना लागू असलेल्या आश्वासित प्रगती योजनेंतर्गत (कॅश) पदोन्नती देण्याबाबतचे प्रस्ताव विद्यापीठामार्फत ऑनलाईन पध्दतीने स्वीकारून कुलगुरुंचे नामनिर्देशित सदस्य व विषयतज्ञ यांना नियुक्त करण्याची कार्यवाही देखील ऑनलाईन पध्दतीने केली जात आहे.

शासनाच्या दिनांक ०८/०३/२०१९ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांतील शासकीय/अशासकीय महाविद्यालये/संस्थांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी दिनांक ०१/०१/२०१६ पासून लागू करण्यात आल्या आहेत. परंतु कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे पदोन्नतीचे कामकाज स्थगित झाले होते. तथापि, लॉकडाऊनमध्ये शिथीलता करण्यात आल्यानंतर सदय:स्थितीत ऑनलाईन प्रस्ताव स्वीकारून विद्यापीठ स्तरावरून कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तंत्र विद्यालयाच्या इमारतीमधील कामे पूर्ण करण्याबाबत

**(५६) * ६६७० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ४१५५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई आणि कोकण येथील पाच औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तंत्र विद्यालयाच्या इमारतीमधील अनेक कालावधीपासून अपूर्ण असलेल्या कामांची सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत कार्यवाही करुन सदरहू चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक :** (१), (२) व (३) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मांडवी, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वाणगाव (वसतिगृह), औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पेण (वसतिगृह) व शासकीय तांत्रिक विद्यालय, जव्हार या पाच संस्थांच्या अपूर्ण बांधकामाबाबत व इमारत हस्तांतरण करण्यास झालेल्या विलंबाच्या अनुषंगाने अंशत: चौकशी पूर्ण झाली आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मांडवी व औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड यांच्या अपूर्ण बांधकामाबाबत व इमारत हस्तांतरण करण्यास झालेल्या विलंबाच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चेंबूर, मुंबई-७१ यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मांडवी व औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड या इमारतीबाबत चौकशीचा प्रश्न उद्भवत नसल्याचे कळवून पुढीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीबाबत स्पष्टीकरण दिलेले आहे.

१. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मांडवी :-

सदर कामाची मुदत दिनांक ३०/११/२०१८ पर्यंत होती. कंत्राटदार मे.इकोस्ट्रक प्रा.लि. यांचेकडून इमारतीचे ९०% स्थापत्य कामे पूर्ण करण्यात आले. तद्नंतर मूळ कंत्राटदार यांनी काम करण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे मे, २०१९ मध्ये दंडात्मक कार्यवाही करून निविदेतील तरतुदीनुसार निविदा समाप्ती करण्यात आली. सध्या उद्वाहनांच्या कामांसाठी मे.ईरास एलिवेटर्स व एस्केलेटर्स प्रा.लि. व विद्युतीय कामांसाठी मे.दानिश इलेक्ट्रिकल्स ॲण्ड सेल्स प्रा.लि. या कंत्राटदारांची नियुक्ती करून उर्वरीत स्थापत्य व विद्युत कामे प्रगतीपथावर आहेत. तत्कालीन उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णय क्र.आयटीआय-२०१०/(१७०/१०)/व्यशि-२, दिनांक ११/०८/२०१० अन्वये रुपये ८,१४,३८,५५४/- इतक्या रकमेस औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या कार्यशाळा व प्रशासकीय इमारत बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सन २०१८-२०१९ च्या सीएसआर मधील बाबीच्या वर्णनातील फरकामुळे तसेच विद्युतीकरणाच्या कामांची आधुनिक कार्यपध्दती, आधुनिक वीज बचत करणारी उपकरणे आणि तंत्रज्ञानामध्ये झालेला बदल यामुळे मूळ प्रशासकीय मान्यतेच्या रकमेत रुपये ३,४९,६८,५५७/- इतकी वाढ झाली असून या वाढीसह मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांच्या दिनांक ०७/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये एकूण रुपये ११,६४,०७,१११/- इतक्या रकमेच्या सुधारीत अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर झालेला आहे. याप्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे.

२. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड :-

सदर इमारतीचे स्थापत्य व अंतर्गत विद्युत कामे व उद्वाहनाची कामे पूर्ण झालेली आहेत. सदर इमारतीच्या G+४ इमारतींपैकी G+२ मजल्यामध्ये १० व्यवसाय (ट्रेड) व वर्गखोल्यासाठी वापर सुरु आहे. विद्युत कामांपैकी फायर फायटींगची कामे मार्च, २०२० मध्ये पूर्ण झालेली असून कामाचा पूर्णत्वाचा दाखला सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त न झाल्यामुळे महापालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त होणे प्रलंबित आहे. याप्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे.

कोकण विभागातील उर्वरीत औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वाणगाव (वसतिगृह), औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पेण (वसतिगृह) व शासकीय तांत्रिक विद्यालय, जव्हार यांच्या अपूर्ण बांधकामाबाबत व इमारत हस्तांतरण करण्यास झालेल्या विलंबाबाबत चौकशीचा अहवाल मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (कोकण विभाग), मुंबई-१ यांच्याकडून मागविण्यात आलेला आहे.

-----------------

## यवतमाळ बस स्थानकात सोयी सुविधा देण्याबाबत

**(५७) * ७३१८ डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या यवतमाळ बस स्थानकामध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसणे, शौचालय नसणे तसेच बस स्थानक परिसरात दगडांचा खच भरल्याने व रस्त्याचे काम न करण्यात आल्याने प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार यवतमाळ बस स्थानकात आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) हे खरे नाही.

(२) यवतमाळ येथे जुन्या बस स्थानकाच्या जागेवर नविन बस स्थानक इमारत बांधण्याचे काम सुरु असल्याने राज्य परिवहन विभागीय कार्यालयाच्या परिसरात तात्पुरते बस स्थानक उभारुन तेथील वाहतूक चालविण्यात येत आहे. सदर तात्पुरत्या बस स्थानकामध्ये आसन व्यवस्थेसह

प्रतिक्षालय, चौकशीकक्ष, पिण्याचे पाणी, लाईट, पंखे, प्रसाधनगृह, वाहनतळ, हिरकणी कक्ष इ. आवश्यक सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिपाई संवर्गाची भरती सुरू करण्याबाबत

**(५८) * ६८९४ डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील लिपिकवर्गीय पद भरती दिनांक २८ जानेवारी, २०१९ रोजीच्या शासन आदेशाने सुरू केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, शिपाई संवर्ग पद भरती बंद असल्याने शिपाई संवर्गातील अनुकंपाधारकांना नोकरी मिळत नसल्याने मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिपाई संवर्गातील अनुकंपाधारकांची भरती सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) दिनांक २८ जानेवारी, २०१९ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील अनुदानित/अंशत: अनुदानित शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा (चतुर्थश्रेणी कर्मचारी वगळून) आकृतिबंध निश्चित करण्यात आलेला आहे.

(२) व (३) दिनांक ११ डिसेंबर, २०२० च्या शासन निर्णयान्वये राज्यातील अनुदानित/अंशत: अनुदानित शाळांमधील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना आकृतिबंध निश्चित करण्यात आलेला आहे. त्यानुसार चतुर्थश्रेणी संवर्गातील रिक्त होणारी पदे आपोआप व्यपगत होणार आहेत. रिक्त होणाऱ्या पदांच्या अनुषंगाने संबंधित शाळेला शिपाई भत्ता अनुज्ञेय होणार आहे.

अनुकंपा तत्वावरील नियुक्तीबाबतची कार्यवाही या विभागाच्या दिनांक २१ डिसेंबर, २००२ च्या शासन निर्णयानुसार सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर व उपनगरात बेकायदा शाळा सुरु असल्याबाबत

**(५९) * ७०२७ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहर व उपनगरात सुमारे २०६ शाळांनी शासन आणि महापालिकेची मान्यता न घेताच शाळा सुरु केल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बेकायदा शाळांमध्ये इंग्रजी माध्यमाच्या सर्वाधिक १६२ शाळा तर उर्दू माध्यमाच्या १६, हिंदी माध्यमाच्या १५ आणि मराठी माध्यमाच्या १३ शाळा सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षण हक्क कायद्यानुसार शाळा सुरु करण्यासाठी राज्य शासन आणि महापालिकेची मान्यता बंधनकारक असतानाही अनेक संस्थाचालकांनी झोपडपट्टी भागात शाळा सुरु केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात येवू नये याकरीता कार्यवाही करुन संबंधित संस्थाचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) सदर अनधिकृत शाळांची यादी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करून उक्त अनधिकृत शाळांमध्ये प्रवेश न घेणेबाबत वर्तमानपत्राच्या माध्यमातून पालकांना आवाहन करण्यात आले आहे. तसेच,

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ च्या कलम १८ (५) मधील तरतुदीनुसार सदर अनधिकृत शाळांना द्रव्यदंडाची शिक्षा करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाडा विभागातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळांमधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(६०) * ६३९३ श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडा विभागातील जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळांची संख्या इतर विभागाच्या तुलनेत जास्त असून सदर माध्यमिक शाळांमध्ये वर्ग-२ मुख्याध्यापकांची मंजूर पदे किती आहेत त्या मंजूर पदांपैकी माहे एप्रिल, २०१९ अखेर किती पदे रिक्त आहेत,
(२) तसेच, सदरहू जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळांमध्ये मुख्याध्यापकांची वर्ग-२ ची पदे गेल्या अनेक वर्षापासून रिक्त असून शासनाने वर्ग-२ मुख्याध्यापकांना पदावनत करुन वर्ग-३ चा दर्जा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठवाडा विभागातील माध्यमिक शाळांसाठी असलेली रिक्त पदे भरण्यासाठी तसेच सर्व भौतिक सोयीयुक्त टाईपप्लॅन करुन इमारत बांधण्यासाठी कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) मराठवाडा विभागातील माध्यमिक शाळांमध्ये वर्ग-२ मुख्याध्यापकांची एकूण २९९ पदे मंजूर असून, सर्व पदे रिक्त आहेत.
(२) कार्यवाही सुरु आहे.
(३) होय, मुख्याध्यापक जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचे पद शिक्षकांमधून सेवाजेष्ठतेने भरण्यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच मराठवाडा विभागातील एकूण ५८ माध्यमिक व उच्च माध्यमिक

शाळांमध्ये १४० वर्गखोली व इमारत बांधकामाकरीता रक्कम रुपये २५.२० कोटीच्या प्रस्तावास मान्यता देण्याकरीता प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## ग्रामीण भागातील स्वस्त धान्य दुकानांसाठी ग्रामसभेच्या परवानगीची अट लागू करण्याबाबत

**(६१) * ७९२८ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागात स्वस्त धान्य दुकानांना परवानगी देताना ग्रामसभेच्या परवानगीची अट राज्य शासनाने कोरोनाचे कारण देवून मागे घेतल्याने अपात्र व्यक्तींच्या नावे ग्रामीण भागातील स्वस्त धान्य दुकाने जावू शकतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी ग्रामीण भागातील महिला बचतगटांना व जेथे महिला बचतगट नाहीत तेथे इतरांना ग्रामसभेच्या परवानगीच्या अटीच्या अधिन राहून स्वस्त धान्य दुकाने देण्यात आल्याने ग्रामसभेमध्ये सर्वानुमते निवड झालेल्या व त्याभागातील सर्वांना परिचित झालेल्या व्यक्तीस स्वस्त धान्य दुकान देणे योग्य राहण्याकरीता शासनाने उपाययोजना केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अपात्र व्यक्तीकडून स्वस्त धान्य दुकानात गैरव्यवहार होण्याची शक्यता असल्याने याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) व (२) हे खरे नाही. शासन निर्णय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग दिनांक ०६/०७/२०१७ च्या परिच्छेद क्र.४ (II)(ई) मध्ये रास्तभाव दुकानाचे प्राधिकारपत्र देण्यापूर्वी प्रस्ताव महिला ग्रामसभेकडे विचारार्थ व शिफारशीसाठी पाठविण्याची अट आहे.

कोविड-१९ महामारीच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर ग्रामविकास विभागाने दिनांक १२/०५/२०२० च्या परिपत्रकान्वये ग्रामसभा घेण्यास तात्पुरती स्थगिती दिली होती. त्यामुळे ग्रामसभा होत नसल्याने व क्षेत्रियस्तरावर प्राप्त प्रस्तावांचे निराकरण होण्याच्या दृष्टीने ग्रामसभेच्या अटीबाबत मार्गदर्शन करण्याची क्षेत्रियस्तरावरील मागणी विचारात घेऊन शासन निर्णय दिनांक ०६/०७/२०१७ मधील रास्तभाव दुकाने मंजूर करताना त्याबाबतचा प्रस्ताव ग्रामसभेकडे विचारार्थ वा शिफारशीसाठी पाठविण्याची अट पुढील आदेश होईपर्यंत दिनांक २७/११/२०२० च्या शासन निर्णयान्वये शिथिल करण्यात आली होती.

(३) व (४) ग्रामविकास विभागाने शासन परिपत्रक दिनांक १५/०१/२०२१ अन्वये राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना त्यांच्या ग्रामसभा सामाजिक अंतर व कोविड-१९ च्या अनुषंगाने निर्गमित मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन पूर्वीप्रमाणे आयोजित करण्याची परवानगी दिली आहे. त्याचा विचार करता रास्तभाव दुकान मंजूर करावयाचे प्रस्ताव ग्रामसभेकडे विचारार्थ वा शिफारशीसाठी पाठविण्यासाठी, ग्रामसभा घेण्याच्या अटीस शासन निर्णय दिनांक २७/११/२०२० अन्वये दिलेली शिथिलता दिनांक २५/०२/२०२१ च्या शासन निर्णयान्वये मागे घेण्यात आली आहे.

-----------------

## परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना (डी.सी.पी.एस.) खात्याच्या आर्थिक अनियमिततेबाबत

**(६२) * ७१२३ श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी अनुदानित प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक/अध्यापक विद्यालयातील १०० टक्के अनुदानित पदावरील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० च्या घटनाबाहय शासन निर्णयानुसार परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी संचालक (प्राथ.) व संचालक (माध्य.) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक यांना उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अंमलबजावणीसाठी विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार खातेधारकाने जमा केलेल्या अंशदान व शासनाच्या अंशदानाचा हिशोब आजपर्यंत दिला नसल्याने याप्रकरणी शासन हिशोब देण्याबाबतचे आदेश संबंधित अंमलबजावणी अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना (डी.सी.पी.एस.) राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेत (NPS) समाविष्ट करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतल्यामुळे दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० रोजीचा घटनाबाह्य शासन निर्णय रद्द घोषित करून शिक्षक/कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना व भविष्य निर्वाह निधी योजना पूर्ववत लागू करण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित अनियमितता करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) व (२) वित्त विभागाच्या दिनांक ३१/१०/२००५ च्या शासन निर्णयान्वये परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू करण्यात आली आहे. हे आदेश अनुदानित शैक्षणिक संस्थेतील कर्मचाऱ्यांना लागू आहेत. सदर योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती दिनांक २९/११/२०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित केली आहे.
(३) सदर खात्यातील जमा रकमेच्या पावत्या देण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या आहेत.
(४) वित्त विभागाच्या दिनांक २७/०८/२०१४ रोजीच्या आदेशानुसार परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना (DCPS) राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजने (NPS) मध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १९/०९/२०१९ च्या शासन निर्णयान्वये सदर योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सहाय्यक शिक्षक परिविक्षाधीन (शिक्षण सेवक) कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

**(६३) * ७०४७ श्री.कपिल पाटील : दिनांक २ मार्च, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक ५०७३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किमान वेतन कायद्यानुसार अठरा हजार वेतन मिळणे बंधनकारक असताना सहाय्यक शिक्षक परिविक्षाधीन (शिक्षण सेवक) हे रुपये सहा हजार मानधनावर काम करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहाय्यक शिक्षक परिविक्षाधीन (शिक्षण सेवक) कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करून सहाय्यक शिक्षक परिविक्षाधीन कालावधी कमी करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) शासन निर्णय दिनांक १७/०९/२०११ अन्वये दिनांक ०१/०१/२०१२ पासून प्राथमिक शिक्षण सेवकांना रुपये ६०००/-, माध्यमिक शिक्षण सेवकांना रुपये ८०००/- व उच्च माध्यमिक शिक्षण सेवकांना रुपये ९०००/- असे मानधन दिले जाते.

(२) व (३) प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## समूह विद्यापीठास (क्लस्टर युनिव्हर्सिटी) निधी उपलब्ध करण्याबाबत

**(६४) * ७६८८ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दौंड, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यापीठांवरील महाविद्यालयांचा भार कमी व्हावा व चांगले काम करणाऱ्या महाविद्यालयांना स्वातंत्र्य मिळावे या हेतुने शासनाने सन २०१९ मध्ये उच्च शिक्षण अभियानांतर्गत (रुसा) डॉ.होमी भाभा पहिल्या समूह विद्यापीठाची (क्लस्टर युनिव्हर्सिटी) स्थापना केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त समूह विद्यापीठांतर्गत विज्ञान संस्था, एलफिस्टन महाविद्यालय व सिडनहॅम महाविद्यालय, शासकीय अध्यापक महाविद्यालय या संस्थांचे मिळून स्थापन करण्यात आलेल्या डॉ.होमी भाभा राज्य विद्यापीठाकडे शासनाने दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विद्यापीठ स्थापन करण्यासाठी दोन वर्षापूर्वी रुसाने दिलेल्या ५५ कोटी रुपयांपैकी कोणतीही मदत विद्यापीठाला केली नसून केंद्र व राज्य शासनाचा निधी देण्यात न आल्याने विद्यापीठाच्या पायाभूत सुविधांचा विकास, नव्या योजना प्रलंबित असून नवनियुक्त कुलगुरूंच्या निवासाची सुविधा नसल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार दोन वर्षापूर्वी स्थापन करण्यात आलेल्या सदर समूह विद्यापीठास मंजूर केलेला निधी विनाविलंब अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) हे अंशतः खरे आहे. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेमध्ये निधी वितरणाचे केंद्र व राज्य हिश्श्याचे प्रमाण ६०:४० असे असून केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्यावर केंद्र हिश्श्याच्या प्रमाणात राज्य हिस्सा उपलब्ध करुन दिला जातो. केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध झाल्यावर केंद्र हिश्श्याच्या प्रमाणात राज्य हिस्सा वितरित करण्यात येईल.
(४) सदर समूह विद्यापीठास निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी केंद्र शासनाशी पाठपुरावा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या (आयटीआय) प्रशिक्षणात मूलभूत बदल करण्याबाबत

**(६५) * ६५३५ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औद्योगिक क्षेत्रात वाढलेले डिजिटलायझेशन, ऑटोमेशन, दररोज विकसित होणारे तंत्रज्ञान, जागतिक उद्योगाची गरज विचारात घेऊन राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या (आयटीआय) प्रशिक्षणात मूलभूत बदल करण्याकरीता टाटा कंपनीची मदत घेण्यात येणार असून सदरहू कंपनी दहा हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असल्याने राज्य शासन दीड ते दोन हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेचे स्वरुप काय आहे, सदरहू योजना राबविण्याचा कालावधी काय आहे, योजनेसाठी एकूण किती निधीची आवश्यकता आहे, तसेच टाटा कंपनी कोणत्या अटी/शर्तीवर दहा हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे व उर्वरित निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, याबाबतच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.नवाब मलिक :** (१) टाटा टेक्नॉलॉजी व सहयोगी उद्योजकामार्फत राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे उन्नतीकरण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे.

(२) १. उपकरणे आणि तंत्रज्ञान साधनांचे आधुनिकीकरण करणे, अद्ययावत प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी प्रशिक्षण सामग्री व सुविधा वर्धित करणे, समुपदेशन आणि प्लेसमेंटची सुविधा उपलब्ध करून देणे याकरीता टाटा टेक्नॉलॉजी व त्यांच्या सहयोगी उद्योगांच्या सहकार्याने औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे Upgradation करण्याबाबतचा प्रकल्प प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

२. योजना तीन टप्प्यात तसेच ३ वर्षाच्या कालावधीत राबविण्याचे प्रस्तावित आहे.

३. शासनाकडून आगाऊ रोख स्वरूपात (Advance Payment) तसेच टाटा टेक्नॉलॉजी व त्यांच्या सहयोगी उद्योगांच्यामार्फत One - time contribution in the form of discounts for industrial setup, mentoring support, integration and commissioning, starting new courses and training the trainers या स्वरूपात उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे. म्हणजेच टाटा टेक्नॉलॉजी व सहयोगी उद्योग समुह यांच्याकडून कोणत्याच प्रकारे रोख स्वरूपात निधी प्राप्त होणार नसून त्यांच्याव्दारे प्रकल्पांतर्गंत प्रशिक्षण साधन सामुग्री व सॉफ्टवेअर उपलब्ध करून देतांना किंमतीत Discount या स्वरुपात सहभाग प्राप्त होणार आहे.

४. सदर प्रकल्पासाठी प्रकल्प खर्चाच्या ८८% निधी टाटा टेक्नॉलॉजी व त्यांच्या सहयोगी उद्योगांकडून तसेच १२% निधी राज्य शासनाकडून उपलब्ध होणार आहे. प्राथमिक स्वरूपात प्रकल्पासाठी अंदाजे रूपये १०,९००.३८ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. तथापि, संस्था निहाय टाटा टेक्नॉलॉजी यांच्या मदतीने औद्योगिक प्रशिक्षण संस्थानिहाय मंजूर संस्था विकास आराखडा (Institute Development Plan) तयार करून प्रकल्पाची अंदाजित किंमत निश्चित करण्यात येईल.

(३) प्रस्तावाची तपासणी करण्याची कार्यवाही शासनस्तरावरुन सुरु आहे.

-----------------

## अधीक्षक, शिक्षण आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(६६) * ६५७६ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अधीक्षक, शिक्षण आयुक्त कार्यालय, पुणे यांच्या मनमानी कारभाराचा म्हणजेच प्रवेशाच्या नावाखाली पालकांकडून पैसे जमा करणे, कर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांना चौकशीच्यावेळी ब्लॅकमेल करणे, कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांना अर्वाच्च वागणूक देणे अशा प्रकारच्या तक्रारी प्रशासनाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अधीक्षकांच्या मनमानी व गैरकारभारासंदर्भात सोलापूर येथील श्री.वाडकर यांनी प्रशासनाकडे तक्रार दाखल केली असून तत्कालीन शिक्षण आयुक्त श्री.भापकर यांनी अधीक्षक, शिक्षण आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याविरोधात चौकशीचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तत्कालीन शिक्षण आयुक्त श्री.भापकर यांनी संबंधित अधीक्षक, शिक्षण आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याविरोधात दिलेल्या चौकशीच्या आदेशाच्या अनुषंगाने कार्यवाही करुन त्यांच्याविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) अशा स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, हे खरे आहे.
(२) व (३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने आयुक्त (शिक्षण), कार्यालयाने चौकशी करुन सदर वरिष्ठ लिपिक व त्यांचे वरिष्ठ अधीक्षक यांची अन्य ठिकाणी दिनांक १६/११/२०१५ च्या आदेशान्वये बदली करण्यात आली.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तांबडेमळा (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील मंचर एसटी बस आगाराची दुरवस्था झाल्याबाबत

**(६७) * ६३८२ श्री.प्रसाद लाड, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यात राज्य परिवहन महामंडळाच्या बस वाहतुकीची उत्तम सुविधा मिळावी याकरीता तीन कोटी पन्नास लाख रूपये खर्च करून तांबडेमळा येथील मंचर एसटी बस आगाराचे सन २०१७ मध्ये काम पूर्ण झालेले असतानाही महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे सदरहू बस स्थानक वापराविना पडून असून तेथे कोणत्याही सोयी सुविधा उपलब्ध नसल्याने बस आगाराची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, बस आगाराच्या विनावापर असलेल्या इमारतीत बाहेरील लोकांचे प्रमाण वाढले असून सदरहू परिसर निर्जन व आडबाजूला असल्याने अज्ञात इसमांकडून सदरहू एसटी बस स्थानकाचे नुकसान होत असून येथे अनेक अनुचित प्रकार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार विनाविलंब एसटी बसचा वापर होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) मंचर आगार इमारतीचे काम सन २०१७ मध्ये पूर्ण झाले असून, सदर आगाराचा वापर अद्याप सुरु झालेला नाही. तथापि, सद्य:स्थितीत आगार इमारत व तेथील मूलभूत सोयी सुविधा सुस्थितीत आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) मंचर येथील आगार इमारतीचा वापर करण्याबाबत राज्य परिवहन महामंडळाव्दारे तपासणी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर येथील रिक्त पदे भरण्याबाबत

**(६८) * ७४९६ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर येथील प्रमुख संचालक पद, कुलसचिव, परीक्षा विभाग प्रमुख तसेच विविध विभागांचे प्रमुख प्रभारी पदावर आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर विद्यापीठात अनेक कारणांनी राजीनामा सत्रही सुरू असून विद्यापीठात परीक्षा विभागाचा अनुभव नसणाऱ्या व्यक्तीकडे प्रभारी परीक्षा विभाग प्रमुख पद दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यापीठातील प्रमुख पदे कायमस्वरूपी भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अकृषी विद्यापीठातील रिक्त असलेली सांविधिक पदे भरण्यास शासन पत्र दिनांक ०८/०१/२०२१ अन्वये मंजूरी दिलेली आहे. तसेच दिनांक ११/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये पद भरतीचा सविस्तर प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना सर्व अकृषी विद्यापीठांना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धाड व अमडापूर (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था व तंत्रनिकेतन सुरू करण्याबाबत

**(६९) * ७५४१ श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाड व अमडापूर (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील अल्पसंख्यांक समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असून कौशल्यधारित व्यवहार करण्यावर अधिक भर असतानाही औद्योगिक तसेच तंत्रनिकेतन संस्था नसल्यामुळे शास्त्रशुध्द शिक्षण व प्रशिक्षणाअभावी व्यवसाय करण्यासाठी युवकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धाड व अमडापूर येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था व तंत्रनिकेतन विनाविलंब सुरु करण्यात यावे, अशी मागणी केल्यानंतर मा.अल्पसंख्यांक व कौशल्य विकास उद्योजकता मंत्री महोदयांनी प्रस्ताव सादर झाल्यास मान्यता देण्यात येईल असे उत्तर दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे प्रस्ताव सादर केल्यानंतर जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी याबाबत कौशल्य विकास विभागाकडे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार धाड व अमडापूर येथे औद्योगिक प्रशिक्षण व तंत्रनिकेतन संस्था सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) धाड व अमडापूर येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच तंत्रनिकेतन सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील ग्लोबल मरिन एक्सपोर्ट कंपनीविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(७०) * ७१३३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील प्लॉट नंबर जी २ येथे ग्लोबल मरिन एक्सपोर्ट कंपनीतून सुक्या व ओल्या खाऱ्या माश्यांपासून फिश ऑईल व फिश पावडर अशी उत्पादने तयार करण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुक्या व ओल्या माश्यांवर प्रक्रिया केल्यामुळे कंपनी सभोवतालच्या परिसरात दुर्गंधी पसरत असल्याने तेथील स्थानिक रहिवाशांच्या आरोग्यावर परिणाम झाल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनी प्रशासनाकडून सभोवतालच्या परिसरात दुर्गंधी पसरू नये यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली, तसेच, सुक्या व ओल्या माश्यांवर प्रक्रिया करुन निर्मिती करण्यात येणाऱ्या उत्पादनासाठी महाराष्ट्र प्रदूषण महामंडळाकडून परवानगी घेण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सभोवतालच्या परिसरात दुर्गंध पसरू नये याकरीता कंपनी प्रशासनाकडून दुर्गंधीनाशक फवारणी व्यवस्था बसविण्यात आली आहे. सदर उद्योगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्र घेतले असून संमतीपत्राची वैधता ३१/०१/२०२५ पर्यंत आहे.
(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून सदर उद्योगास दुर्गंधी निर्माण केल्याबद्दल दिनांक १५/१०/२०२० रोजी उत्पादन बंदचे आदेश देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळा बंद असताना शाळांमधील स्वयंपाकासाठी साहित्याची खरेदी केल्याबाबत

**(७१) * ७७८८ श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील शाळा बंद असताना शाळांसाठी स्वयंपाकासाठीच्या साहित्याची खरेदी करण्याचा निर्णय प्राथमिक शिक्षण संचालनालयाने माहे जानेवारी, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात घेतल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वयंपाकघर साहित्याच्या खरेदीसाठी ७८ कोटीची निविदा प्रक्रिया संचालनालयाकडून करण्यात आली असून सद्य:स्थितीत शाळा बंद तसेच निधीची कमतरता असताना ताटवाटी अगोदरच खरेदी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे आहे.

(२) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पात्र शाळांना स्वयंपाकगृह उपकरणे उपलब्ध करुन देण्याकरीता सन २०१९-२०२० या वर्षात केंद्र शासनाने एकूण रुपये ७७.५६ कोटी इतका निधी मंजूर केला आहे. सदर निधीतून स्वयंपाकगृह उपकरणे खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

सदर स्वयंपाकगृह उपकरणाचा वापर शाळा स्तरावर पुढील पाच ते सात वर्षापर्यंत केला जाऊन विद्यार्थ्यांना अधिक सुविधाजनक पध्दतीने आहाराचे सेवन करणे शक्य होणार आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमधील परीक्षा भवनाच्या नवीन इमारतीच्या सदोष बांधकामाबाबत

**(७२) * ६६३७ श्री.विलास पोतनीस, श्री.महादेव जानकर, श्री.रामनिवास सिंह, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या कलिना येथील शिक्षण संकुलात अनेक नव्या इमारती निवासी दाखला नसल्यामुळे वापराविना पडून असल्याचे माहे जानेवारी, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले असून नवीन

इमारतीसह परीक्षा भवन, वसतिगृह, ग्रंथालय यासह २५ ते ३० इमारतींना अद्यापपर्यंत भोगवटा व अग्निशमन दलाचे अग्निसुरक्षा प्रमाणपत्र मिळाले नसल्याने कंत्राटदराने इमारतीचे हस्तांतरण मुंबई विद्यापीठाला केले नसतानाही पुनर्मुल्यांकन विभागासह इतर विभागाची कार्यालये या इमारतीत स्थलांतरीत करुन कुलगुरु, अधिकारी यांचे कक्ष तयार करण्यात आल्याने विद्यापीठातील कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या जीवास धोका निर्माण झाल्याचे दिनांक ०७ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू इमारतीचा वापर होत नसल्याने इमारतीतील लाकडी सामानांना वाळवी लागली असून कंत्राटदाराने काही इमारतींचा ताबा विद्यापीठाकडे दिलेला नाही तसेच उक्त नवीन इमारतीत अनेक ठिकाणी सुरु असलेली गळती, इमारतीतील बंद असलेली मध्यवर्ती वातानुकूलित यंत्रणा, अस्वच्छ शौचालये, पिण्याच्या पाण्याची नसलेली व्यवस्था, पायऱ्यांवर असलेले कचऱ्याचे साम्राज्य इत्यादी असुविधांमुळे कर्मचारी नवीन परीक्षा भवनाच्या इमारतीत जाण्यास इच्छुक नसून कोट्यवधी रुपये खर्चून बांधलेल्या इमारतींच्या कामांचा दर्जा देखील चांगला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार सदर इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र मिळण्याबाबत तसचे, इमारतीच्या कामाच्या दर्जाबाबत अधिसभा सदस्यांनी केलेल्या चौकशीच्या मागणीसंदर्भात कार्यवाही करुन मुंबई विद्यापीठातील परीक्षा भवनाच्या नवीन इमारतीच्या सदोष बांधकाम प्रकरणी दोषी कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र मिळण्याच्या अनुषंगाने सदर इमारतीचे वास्तुविशारद यांचेमार्फत अग्निशमन दलाचे भाग ना-हरकत प्रमाणपत्र घेतले असून, पर्यावरण ना-हरकत प्रमाणपत्राकरीता त्यांनी अहवाल

सादर केला आहे. सदरचे पर्यावरण ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर वास्तुविशारदामार्फत भोगवटा प्रमाणपत्राकरीता अर्ज करणे अभिप्रेत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्‌यकीय प्रतिपूर्ती कॅशलेसच्या स्वरूपात देण्याबाबत

**(७३) * ६३९४ श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सावित्रीबाई फुले-फातिमा शेख कॅशलेस कुटुंब आरोग्य योजना लागू करण्याबाबत शिक्षक भारती संघटनेनी मागणी केली असून त्यानुषंगाने राज्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देण्यात येणारी वैद्‌यकीय प्रतिपूर्ती योजना ही कॅशलेसच्या स्वरूपात देण्याबाबत सर्व प्रकारची माहिती शासनाने शाळांकडून घेतली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कॅशलेश प्रतिपूर्ती योजना शिक्षकांना तात्काळ लागू करण्याबाबत मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांनी सभागृहात आश्वासित केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेश वैद्‌यकीय प्रतिपूर्ती योजना लागू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे, उक्त प्रस्तावास मान्यतेबाबतची सद्‌य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) अंशत: खरे आहे. राज्यातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेस कुटुंब आरोग्य योजना लागू करण्याबाबत शिक्षक भारती संघटनेने मागणी केली होती. त्यानुषंगाने आवश्यक माहिती शालेय शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयाकडून तसेच ग्रामविकास विभागाकडून मागविण्यात आलेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) राज्यातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना कॅशलेस आरोग्य योजना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव अभिप्रायासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग, वित्त विभाग व नियोजन विभागास सादर करण्यात आला. सदर प्रस्तावावर सदर विभागानी काही मुद्दे उपस्थित केले असून त्यानुषंगाने प्रस्तावाची तपासणी करणेत येत आहे.

-----------------

**विधान भवन :** **श्री.राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.